



पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २६० ■ सोमवार, दि. ३० मार्च २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com


## लश्करचा दहशतवादी अटकेत

**नवीदिल्ली :** दिल्लीतील सुरक्षा यंत्रणांना मोठे यश मिळाले आहे. दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेल आणि केंद्रीय यंत्रणांनी शब्बीर अहमद लोन या दहशतवाद्याला दिल्लीच्या सीमेवरून अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शब्बीर पाकिस्तानी गुप्तचर संस्था आयएसआयच्या सांगण्यावरून बांगलादेशातून एक नवीन मॉड्यूल तयार करत होता. लष्कर-ए-तोयबाचा दहशतवादी शब्बीर अहमद लोन याला दिल्लीच्या सीमेवरून अटक करण्यात आली आहे. तो पाकिस्तानी गुप्तचर संस्था आयएसआयच्या सांगण्यावरून बांगलादेशातून एक नवीन लष्कर-ए-तोयबाचे मॉड्यूल तयार करत होता.

# एकमेकांना दाखविले मुंगेरीलाल के सपने....!

### महापालिका आयुक्तांचा दावा ▸▸ महापालिकेच्या बजेट सभेत अकोलेकरांवर प्रश्न





प्रतिनिधी ३० मार्च

**अकोला:** महापालिकेच्या अर्थसंकल्पीय सभेत आज मुंगेरीलाल के सपनेवर चर्चा सुरु असताना महापालिका आयुक्त डॉ. लहाने यांनी महापालिकेने नागरिकांना व नागरिकांनी महापालिकेला मुंगेरीलाल के हसीन सपने दाखविल्याचा दावा केला. अकोलेकरांना मुंगेरीलाल म्हणत आयुक्तांनी अकोलेकरांची अवहेलना केली असताना त्यावर सत्तारुढ आणि विरोधी नगरसेवक मात्र चुप्पी साधून बसले होते. आयुक्त काय म्हणत आहे याची कल्पना सभागृहात बसलेल्या नगरसेवकांना नसल्याचे आश्चर्य अकोलेकरांनी लाईव्ह सभा पाहताना व्यक्त केले.

महापालिकेच्या नगरसेविका निलोफर खान सोहेल खान यांनी आज महापालिकेच्या फुगविलेल्या बजेटबद्दल तीव्र आक्षेप घेत महापालिकेला आरसा दाखविला. यावेळी बोलताना त्यांनी अकोला महानगरपालिकेचे बजेट म्हणजे जणू 'मुंगेरीलाल के हसीन सपने' ठरत असल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे. कोट्यवधींच्या आकड्यांची आकडेवारी मांडली जात असली, तरी जमिनीवर मात्र विकासाचा 'ठणठणाट' आहे की काय, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. 'गेल्या वर्षी १४५६ कोटींचे बजेट मंजूर झाले होते, त्यापैकी केवळ ७७३ कोटीच खर्च झाले. मग उरलेले ५० टक्के पैसे कुठे गेले?' यावर प्रशासनाचे उत्तर म्हणजे 'तारीख पे तारीख' देण्यासारखेच होते. आयुक्तांनी स्पष्ट केले की, हे केवळ 'अंदाज' असतात. म्हणजे स्वप्न मोठे बघायचे, पण खिशात प्रत्यक्षात किती येणार याचा पत्ता नसतो. नगरसेविकेनी उपरोधिक टोला लगावत म्हटले की, 'प्रशासन अकोलेकरांना सांगते की 'या, आम्ही अकोला स्वच्छ करू, सुंदर करू'. पण प्रत्यक्षात हे फक्त मुंगेरीलालचे स्वप्न वाटते, जे फक्त झोपेतच पूर्ण होतात.' 'आम्ही स्वप्ने बघितलीच पाहिजेत, ध्येय उंच ठेवलेच पाहिजे,' असे म्हणत आयुक्तांनी आपली बाजू सावरून धरली.

### काय म्हणाले नेमके आयुक्त

आपले जे बजेट आहे ते जमा आणि खर्चाचा अंदाज आहे. असे आयुक्त डॉ. सुनील लहाने म्हणाले. आपले नागरिकांकडे दोनशे कोटी रुपयांची कराची थकबाकी आहे. आज ३० मार्च रोजी ७० कोटींची वसुली झाली आहे. उद्या हे वर्ष संपेल. साधारणपणे आम्ही जे मुंगेरीलाल के हसीन सपने नागरिकांना दाखविले ते नागरिकांनी देखील आम्हाला दाखविले. असे सांगत आयुक्तांनी अकोलेकरांनी कर न भरता मुंगेरीलाल के सपने दाखविल्याचा टोला लगावला. अकोलेकरांनी आम्हाला १३० कोटी दिलेच नाही. आपण स्वप्न नेहमी पाहिले पाहिजे. पण, सव्वाशे कोटींची वसुली झाली पाहिजे असा आग्रह आयुक्त डॉ. सुनील लहाने यांनी महासभेत व्यक्त केला.

## इराणच्या तेलावर अमेरिकेची नजर

**तेल अवीव:** ट्रम्प यांनी म्हटले आहे की त्यांना इराणचे तेल आपल्या नियंत्रणात घ्यायचे आहे. रविवारी फायनान्शियल टाइम्सला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी हे विधान केले. ट्रम्प म्हणाले, 'खरं सांगायचं तर, इराणचे तेल घेणे ही माझी आवडती गोष्ट आहे. यावर ताबा मिळवण्यासाठी अमेरिकेकडे अनेक पर्याय आहेत.' त्यांनी पुढे म्हटले, 'अमेरिकेतील काही लोक म्हणतात की तुम्ही असे का करत आहात?' पण ते मूर्ख आहेत.' त्यांनी खार्ग बेटाचा उल्लेख करत म्हटले, 'कदाचित आम्ही खार्ग बेट घेऊ, कदाचित नाही.

# आर एस एस भाजपसारखे १० पक्ष उभे करू शकता!

प्रतिनिधी ३० मार्च

### अभिनेते शरद पोंक्षेंचा भाजपला इशारा

**नागपूर:** भाजपची काँग्रेस व्हायला लागली तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ कट्टर हिंदुत्व बाळगणाऱ्या १० भाजप उभ्या करू शकतो, असा खणखणीत इशारा ज्येष्ठ अभिनेते शरद पोंक्षे यांनी सत्ताधारी भाजपला दिला आहे. आम्हाला कुणीच हरवू शकत नाही. आता आम्हीच आहोत, या अहंकारात भाजपने राहू नये, असेही ते यावेळी म्हणाले. शरद पोंक्षे नागपूर येथे राज्य सरकारच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्यावतीने आयोजित ३ दिवसीय रामस्मरण व्याख्यानमालेचे द्वितीय पुष्प गुंफताना भारत एक हिंदू राष्ट्र या विषयावर बोलत होते. रेशीमबागेतील महर्षी व्यास सभागृहात हा कार्यक्रम झाला. ते म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारमुळे आज हिंदू धर्माला चांगले दिवस आले. मधल्या काळात काँग्रेस नेते राहुल गांधी पंतप्रधान झाले असते तर देशाचे वाटोळे झाले असते. काँग्रेसच्या कोणत्याही आंदोलनाने देशाचे भले झाले नाही. त्यांच्या कोणत्याही आंदोलनामुळे देशाला स्वातंत्र्य मिळाले नाही. मुळात हा पक्षच ब्रिटिशांनी स्थापन केला आहे. शरद पोंक्षे यांनी यावेळी संघात भाजपसारखे १० पक्ष उभे करण्याची ताकद असल्याचेही ठणकावून सांगितले. आज भारतात हिंदूंचे सण, उत्सव मोठ्या थाटात साजरे केले जात आहेत.

# नीलम गोऱ्हेही अशोक खरातच्या भक्त

प्रतिनिधी ३० मार्च

**नाशिक :** नाशिकच्या स्वयंघोषित 'कॅप्टन' अशोक खरात याच्या काळ्या कारनाम्यांनी संपूर्ण महाराष्ट्र हादरला असतानाच, आता या प्रकरणात सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी नीलम गोऱ्हे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. नीलम गोऱ्हे या गेल्या ५ ते ६ वर्षांपासून अशोक खरातच्या संपर्कात होत्या आणि राजकीय फायद्यासाठी त्याला भेटत होत्या, असा खळबळजनक दावा देसाई यांनी केला आहे.

तृप्ती देसाई म्हणाल्या की, नीलम गोऱ्हे गेली पाच ते सहा वर्ष या भोंदूबाबा अशोक खरातकडे जात होत्या. त्यांना विधान परिषदेवर आमदारकी हवी होती. इतर वेळेस नीलम गोऱ्हे अनेक गोष्टींवर बोलतात. आता अशोक खरातवर का बोलत नाहीत? कारण त्यांचे खरातशी संबंध आहेत. त्या खरातकडे जात होत्या. नाशिकच्या कॉलेज रोड येथील अशोक खरातच्या ऑफिसमध्ये नीलम गोऱ्हे जात होत्या, असा आरोप त्यांनी केलाय. तृप्ती देसाई पुढे म्हणाल्या की, तो पाथर्डी येथील हॉटेलमध्ये देखील भेटायला आला होता. तो तिथं तुम्हाला भेटण्यास का आला होता? तुमच्यात आणि त्याच्यात काही आर्थिक व्यवहार आहेत का? की आणखीन काही आहे? या सगळ्या गोष्टी समोर यायला हव्या. ३९ आमदारांमध्ये नीलम गोऱ्हे या अशोक खरातला भेटायला जात होत्या.

### रुपाली चाकणकर गैरहजर

राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्ष रुपाली चाकणकर यांना खरात प्रकरणी चौकशीसाठी हजर राहण्यासाठी आयटीकडून समन्स बजावण्यात आलंय. मात्र २४ तास उलटून गेल्यानंतरही रुपाली चाकणकर चौकशीसाठी एसआयटी समोर हजर झालेल्या नाहीत. रुपाली चाकणकर यांनी महिला आयोगाच्या अध्यक्षा असताना अशोक खरात आणि त्याच्या ट्रस्टला कोणता फायदा पोहोचवला आहे का? याची चौकशी एसआयटीला करायची आहे. मात्र रुपाली चाकणकरांकडून एसआयटीच्या समन्सला कोणताच प्रतिसाद देण्यात आलेला नाही. त्यामुळे रुपाली चाकणकर एसआयटीसमोर चौकशीसाठी नाशिकला हजर राहणार का? असा प्रश्न विचारला जातोय.

## तुषार दोशी सक्तीच्या रजेवर

**सातारा :** सातारा जिल्हा परिषद राडा प्रकरण सातारा पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांना भोवले आहे. सातारा पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांना सातारा जिल्हा परिषद राडा प्रकरणाची चौकशी होईपर्यंत सक्तीच्या रजेवर जाण्याचे आदेश देण्यात आले आहेत. चौकशी होईपर्यंत अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैशाली कडुकर यांच्याकडे सातारा पोलीस अधीक्षक पदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. तुषार दोशी हे महाराष्ट्र पोलीस दलातील एक वरिष्ठ आय पी एस अधिकारी आहेत, सातारा जिल्हा परिषद अध्यक्ष-उपाध्यक्ष निवडणुकीदरम्यान झालेल्या गदारोळामुळे आणि राजकीय संघर्षामुळे चर्चेत आहेत. त्यांच्यावर विधानपरिषदेत निलंबनाची घोषणा झाली होती. मात्र तो निर्णय सभापतींनी स्थगित केला होता. दरम्यान सातारा जिल्हा परिषद निवडणुकीच्या वेळी मंत्री शंभूराज देसाईंना झालेल्या धक्काबुक्की प्रकरणी पोलीस यंत्रणेने निष्क्रियता दाखवल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात आला.

# सहकार पॅनलचा दणदणीत विजय

## अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक निवडणूक निकाल घोषित



प्रतिनिधी ३० मार्च

**अकोला:** दि अकोला - वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.अकोलाच्या व्यवस्थापन समिती निवडणूकीत डॉ. सतोषकुमार कोरपे, डॉ.जयकुमार कोरपे, गोपाल काकड, अंजिक्य राऊत, कल्पना पाचपोर, अरविंद इंगोले, रामेश्वर वाघ, अनिल जाधव, जावेद पटेल, डॉ.धिरज देशमुख यांनी अविरोध विजय प्राप्त केला. तर आज दि. अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या (सन २०२६-२०३१) निवडणुकीचे बिगुल वाजल्यानंतर आज विविध मतदारसंघांचे निकाल अधिकृतपणे जाहीर करण्यात आले आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी नितेशचंद्र प्र. साबळे यांनी या निकालांची घोषणा केली. निवडणुक झालेल्या महिला प्रतिनिधींच्या दोन जागांसाठी झालेल्या अत्यंत चुरशीच्या लढतीत गिताबाई महादेव ठाकरे आणि अपर्णा शिरीषराव धोत्रे यांनी बाजी मारली आहे. गिताबाई महादेव ठाकरे (रा. खरोळा, जि. वाशिम) यांनी सर्वाधिक ८५१ मते मिळवून आपले वर्चस्व सिद्ध केले. अपर्णा शिरीषराव धोत्रे (रा. अकोला) यांनी ८४९ मते मिळवत दुसऱ्या जागेवर विजय मिळवला. या निवडणुकीत सौ. छायाताई वामनराव देशमुख यांना ३१५ मतांवर समाधान मानावे लागले. या मतदारसंघात एकूण १०८५ वैध मते नोंदवण्यात आली, तर ३० मते बाद (अवैध) ठरली. इतर मागासवर्गीय प्रवर्गातून ललीत सुधाकरराव बहाळे (रा. अकोली जहागीर, ता. अकोट) यांनी एकतर्फी विजय संपादन केला आहे.

ललीत बहाळे यांना एकूण ९२६ मते मिळाली. त्यांचे प्रतिस्पर्धी महेश भगवंतराव महल्ले यांना केवळ १३० मते मिळाली. या मतदारसंघात एकूण १०५६ वैध मतांची नोंद झाली असून ५९ मते

### हा सहकाराचा व शेतकऱ्यांचा विजय - संतोषदादा कोरपे



अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत सहकार पॅनलच्या ऐतिहासिक विजयानंतर, पॅनलचे नेते आणि माजी अध्यक्ष संतोषदादा कोरपे यांनी सर्वसामान्य शेतकऱ्यांप्रती आपली कृतज्ञता व्यक्त केली आहे. सहकार पॅनलाचा हा विजय जुन्या अकोला जिल्ह्यातील १३ तालुक्यांमधील समस्त कष्टकरी शेतकऱ्यांचा आणि त्यांच्या विश्वासाचा आहे. निवडून आलेल्या २१ संचालकांच्या सोबतीने ही बँक यापुढे अधिक वेगाने प्रगती करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. बँक केवळ शेतकऱ्यांच्या हिताचेच चिंतन करणार नाही, तर समाजातील इतर गरजू आणि निडी व्यक्तींनाही मदतीचा हात देण्याचे काम अविरतपणे सुरू ठेवेल. संतोषदादा कोरपे यांनी या विजयाचे श्रेय अकोला आणि वाशिम जिल्ह्यातील सर्व सभासदांना दिले असून, भविष्यात बँकेच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्याचे आश्वासन दिले आहे.

# शिक्षण विभागाचा मोठा निर्णय!

## 15 जूनपासून सुरु होणाऱ्या शालेय सत्रात बदल



प्रतिनिधी ३० मार्च

**मुंबई:** शिक्षण संचालनालयाकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या पत्रात म्हटले आहे की, राज्यातील राज्य मंडळाच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या उन्हाळी सुट्टीच्या कालावधीमध्ये एक वाक्यता व सुसंगती आणण्यासाठी नवीन बदल केले आहेत. याप्रमाणे राज्यातील राज्य मंडळाच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची सन २०२६ ची उन्हाळी सुट्टी व शैक्षणिक वर्ष २०२६-२७ वर्षात हे बद करण्यात आले आहेत. राज्य मंडळाच्या सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांना शनिवार दि. ०२ मे, २०२६ पासून सुट्टी जाहीर करण्यात येत आहे. राज्यातील इतर मंडळाच्या शाळा वेळापत्रकानुसार सुरू असल्यास अथवा अशा शाळांमध्ये महत्वाचे शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येत असल्यास, विद्यार्थ्यांना सुट्टी जाहीर करण्याबाबत शाळा प्रशासनाने त्यांच्या स्तरावर उचित निर्णय घ्यावा. पुढील शैक्षणिक वर्ष सन २०२६-२७ मध्य विदर्भ तसेच इतर सर्व विभागातील राज्य मंडळाच्या शाळा सोमवार दि. १५ जून, २०२६ रोजी सुरू करण्यात याव्यात. जून महिन्यातील विदर्भाचे तापमान विचारात घेता उन्हाळ्याच्या सुट्टी नंतर तेथील राज्य मंडळाच्या शाळा सोमवार दि. १५ जून २९ जून पर्यत सकाळ सत्रात ७.०० ते ११.४५ या वेळेत सुरू करण्यात याव्यात.







## 'लिव्ह-इन'मधील जोडपे ठरणार 'विवाहित'

**नवीदिल्ली :** भारताच्या आगामी २०२७ च्या जनगणनेसंदर्भात केंद्र सरकारने एक ऐतिहासिक आणि धाडसी निर्णय घेतला आहे. सरकारकडून लिव्ह-इन रिलेशनशिप्स (सहजीवन संबंध) विषयी एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे.

केंद्र सरकारने घेतलेल्या नवीन निर्णयानुसार, आता लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या जोडप्यांची गणना देखील 'विवाहित' म्हणून केली जाणार आहे. या निर्णयामुळे देशातील सामाजिक आकडेवारी संकलित करण्याच्या पद्धतीत मोठा बदल होणार आहे. २०२७ च्या जनगणनेसाठी तयार करण्यात आलेल्या नवीन नियमावलीत लिव्ह-इन जोडप्यांना वेगळ्या श्रेणीत न ठेवता त्यांना विवाहित जोडप्यांच्या समकक्ष मानले जाईल. आतापर्यंत जनगणनेमध्ये केवळ कायदेशीररित्या विवाहित असलेल्या लोकांचीच नोंद 'विवाहित' म्हणून केली जात असे. मात्र, बदलत्या सामाजिक परिस्थितीचा विचार करून सरकारने हा निर्णय घेतला आहे. जर जोडपे बऱ्याच काळापासून एकत्र राहत असेल, तर ते वैवाहिक स्थितीखाली अर्ज भरू शकतात. ही जनगणना डिजिटल स्वरूपातही उपलब्ध आहे, ज्यामुळे लोकांना स्वयं-गणना पोर्टलद्वारे आपली माहिती ऑनलाइन भरता येते.



CMYK CMYK

सिटी न्यूज अमरावती

सोमवार, दि. ३० मार्च २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

# रस्त्यात अडवून महिलेवर अतिप्रसंग करणारा आरोपी अटकेत

**अमरावती :** रस्त्यात अडवून पैसे लुटले, त्यानंतर महिलेला बाजूला नेऊन तिच्यावर अतिप्रसंग करणाऱ्या आरोपीला अमरावती पोलिसांनी अटक केली आहे. काल दि. २८/०३/२०२६ रोजी रात्री ८ वाजून ३० वा. च्या सुमारास पो. स्टे. फ्रेजरपुरा हद्दीतील भानखेडा गावात जाणारे रोडवर जंगल परीसरात पिडीता व तिचा मित्र असे त्यांचे ॲक्टीव्हा वाहनावर जात असतांना अज्ञात पाच लोकांनी त्यांना अडवुन जबरीने लाथाबुक्यांने मारहाण करुन त्यांचे जवळील १२० रुपये काढुन घेतले व त्यातील एका इसमाने पिडीतेला बाजुला नेवुन तिचेवर जबरीने अतिप्रसंग केला. या अनुषंगाने पो स्टे फ्रेजरपुरा अप. क्र. १८९/२०२६ कलम ७०(१), ७७, १२७(२), ३१०(२), ३५१(३) ँए गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्हयातील पाचही आरोपींना पो स्टे फ्रेजरपुरा यांनी लागलीच ताब्यात घेतले आहे. पुढील तपास पो स्टे फ्रेजरपुरा करित आहे.



माजी खासदार नवनीत रवी राणा यांनी राजस्थानचे उपमुख्यमंत्री दिया कुमारी यांची भेट घेतली व विविध विषयावर चर्चा केली.

# जिल्हा काँग्रेस कमिटीने केला शहराध्यक्ष आतिश शिरभाते यांचा सत्कार

प्रतिनिधी ३० मार्च

**दर्यापूर:** अमरावती जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्ह्यातील नवनिर्वाचित नगरसेवक तथा नगराध्यक्ष यांचा सत्कार सोहळा अमरावती येथे काँग्रेस कार्यालयात अमरावती लोकसभा मतदारसंघाचे खासदार बळवंत वानखडे यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आला.

अमरावती जिल्ह्यामधून दर्यापूर शहरातून २५ पैकी १७ नगरसेवक तसेच नगराध्यक्ष या २५०० मतांच्या लीडने निवडून आणल्याबद्दल दर्यापूर शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आतिश शिरभाते



यांचा भव्य सत्कार अमरावती जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला यावेळी कृषी उत्पन्न बाजार समिती दर्यापूरचे सभापती सुनील पाटील गावंडे पंचायत समितीचे माजी सभापती प्रदीप बापू देशमुख कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक साहेबराव भदे. अमरावती जिल्हा काँग्रेस कमिटीचे महासचिव रामेश्वर अभ्यंकर अंजनगाव सुर्जी काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रमोद भाऊ दाळू कोकणा जिल्हा परिषद चे माजी सदस्य नाईक साहेब आधी मान्यवरांच्या उपस्थितीत शहराध्यक्ष आतिश शिरभाते यांनी घावघवीत यश मिळवून दिल्याबद्दल सत्कार करण्यात आला होता.

# स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ञ् संघटनेच्या अध्यक्ष डॉ. शलाका बारी यांनी पदभार सांभाळला

प्रतिनिधी ३० मार्च

**अमरावती :** अमरावती प्रसूतीशास्त्र आणि स्त्रीरोग सोसायटी ही महाराष्ट्रातील अमरावती येथे स्थित एक व्यावसायिक वैद्यकीय संस्था आहे. जी फेडरेशन ऑफ ऑब्सेस्ट्रीक अँड गायनॅकॉलॉजिकल सोसायटी ऑफ इंडिया शी संलग्न आहे. ही संस्था महिलांच्या आरोग्य सेवेत सुधारणा करणे, संशोधनाला चालना देणे आणि स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्रातील शस्त्रक्रिया कौशल्ये वाढवणे यावर लक्ष केंद्रित करते. तसेच अनेकदा राज्य आरोग्य आरोग्य उपक्रमांसोबत सहकार्य करते. ही संस्था fogsi नेटवर्कचा एक भाग म्हणून कार्यरत आहे. ही संस्था महिलांच्या आरोग्याला प्रोत्साहन देणे, प्रशिक्षण देणे आणि या क्षेत्रातील घडामोडीनंवर चर्चा



करण्यासाठी शैक्षणिक बैठका आयोजित करण्याचे काम करते. रविवार दिनांक २९ मार्च २०२६ रोजी अमरावती येथील हॉटेल ग्रँड मेहफिल स्थित रुबी हॉल येथे ̧he ostbetrics and gynaecologicaled societyed amravatied& esecutive& termed 2026 च्या नवीन कार्यकारी समितीचा पदग्रहण समारंभाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून संघटनेच्या राज्य कार्यकारिणी अध्यक्ष मुंबई येथील ज्येष्ठ स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ञ् डॉ. माधुरी पटेल तसेच डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व संशोधन केंद्र चे अधिष्टाता - डॉ. ए. टी.देशमुख यांच्या अध्यक्षतेत हा पदग्रहण समारंभ थाटात पार पडला. यावेळी संघटनेच्या माजी अध्यक्ष - डॉ. रश्मी कहार, डॉ. पूनम बेलोकार, डॉ. प्रांजल सारस्वत शर्मा,उपाध्यक्ष - डॉ. अनिता बोबडे, सचिव - डॉ. ललिता लोखंडे (डोळे), सहसचिव - डॉ. स्नेहा राठी, डॉ. प्रज्ञा चौधरी, संघटनेच्या ज्येष्ठ सदस्य - डॉ. बबिता मिसर, डॉ. मीनल देशमुख, झोनल को - ओर्डीनेटर - डॉ. मंगल राठी, डॉ. कालिंदी राणे, डॉ. समता चौधरी, क्लिनिकल सेक्रेटरी - डॉ. अपूर्वा मुंदडा, डॉ. तनया देशमुख, जनसंपर्क अधिकारी - डॉ. दीपाली किटुकले, डॉ. उर्वशी हातगांवकर आदी उपस्थित होते. यादरम्यान संघटनेच्या २०२४-२०२५ कार्यकारिणीच्या मावळत्या अध्यक्ष - डॉ. पूनम बेलोकार यांच्याकडून २०२६-२०२७ कार्यकारी समितीची नवनियुक्त अध्यक्ष म्हणून डॉ. शलाका बारी यांनी तर सचिव म्हणून डॉ. सायली जहागीरदार यांनी आपल्या पदभाराची सूत्रे स्वीकारली.

# ३१ मार्च अंतिम मुदत; मालमत्ता कर भरा अन्यथा कारवाई अटळ

## ♦ २५ टक्के शास्ती सूटची शेवटची संधी ♦ महानगरपालिकेचा थकबाकीदारांना इशारा

प्रतिनिधी ३० मार्च

**अमरावती:** अमरावती महानगरपालिकेकडून मालमत्ता कर थकबाकीदारांसाठी जाहीर करण्यात आलेल्या शास्ती/दंड माफी योजनेला अंतिम टप्पा आला असून नागरिकांनी ३१ मार्च २०२६ पूर्वी कर भरून सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. निर्धारित मुदतीत कर न भरल्यास कठोर वसुली कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

या विशेष योजनेअंतर्गत थकबाकीसह मालमत्ता कराची एकरकमी भरपाई करणाऱ्यांना शास्तीच्या रकमेवर २५ टक्के सूट देण्यात येणार आहे. तसेच ऑनलाइन माध्यमातून कर भरल्यास अतिरिक्त ३ टक्के सवलत मिळणार आहे. नागरिकांना घरबसल्या डिजिटल पद्धतीने कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा प्रमुख स्रोत असलेल्या मालमत्ता करातून शहरातील रस्ते, स्वच्छता, पाणीपुरवठा, दिवाबत्ती, आरोग्य सुविधा व इतर विकासकामे राबविली जातात. त्यामुळे कर वसुली वाढविण्यासाठी प्रशासनाने विशेष मोहीम सुरू केली आहे.

प्रशासनाने इशारा दिला आहे की, थकबाकीदार मालमत्तांवर जप्ती, सिलिंग, दंडात्मक कारवाई तसेच कायदेशीर प्रक्रिया राबविण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांनी शेवटच्या क्षणाची वाट न पाहता त्वरित कर भरणा करावा.

आयुक्तांचे आवाहन

शहर विकासासाठी नागरिकांचा सहभाग आवश्यक असून सवलतीच्या कालावधीत सर्वांनी मालमत्ता कर भरावा,ङ्ग असे आवाहन महानगरपालिका आयुक्तांनी केले आहे.

Paytmed, Google Payed, BhIMed, PhonePe, QR कोड तसेच डेबिट व क्रेडिट कार्डद्वारे ऑनलाइन कर भरण्याची सुविधा उपलब्ध असून अधिक माहितीसाठी महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# नयना गुंडे यांनी विभागीय आयुक्त पदाचा पदभार स्विकारला

प्रतिनिधी ३० मार्च

**अमरावती:** श्रीमती नयना गुंडे यांनी विभागीय आयुक्त पदाचा कार्यभार डॉ. श्वेता सिंघल यांच्याकडून आज स्विकारला. श्रीमती गुंडे ह्या यापूर्वी महिला व बालविकास आयुक्त म्हणून महिला व बालविकास आयुक्तालय पुणे येथे कार्यरत होत्या. त्या भारतीय प्रशासकीय सेवेतील २००८ च्या तुकडीच्या महाराष्ट्र कॅडरच्या अधिकारी आहेत. यावेळी उपस्थित



अमरावतीचे जिल्हाधिकारी आशिष येरेकर, विभागीय आयुक्तालयाचे अपर आयुक्त सुरज वाघमारे, अजय लहाने यांनी श्रीमती गुंडे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

# राणा कुटुंबाकडून वसुधाताई देशमुख यांचा सन्मान

प्रतिनिधी ३० मार्च

**अमरावती :** माजी मंत्री वसुधाताई देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित जीवन गौरव सोहळा सांस्कृतिक भवन, अमरावती येथे मोठ्या उत्साहात व दिमाखात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान पालकमंत्री नामदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी भूषविले.

या प्रसंगी आमदार रवी राणा व माजी खासदार नवनीत राणा यांच्या वतीने सुनील राणा यांनी वसुधाताई देशमुख यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मानपूर्वक सत्कार केला.




तसेच आई अंबा देवी व एकविरा देवी यांच्या कृपेने त्यांना उदंड आयुष्य लाभावे, अशा शुभेच्छा उपस्थित शुभचिंतकांनी व्यक्त केल्या. कार्यक्रमास युवा स्वाभिमान पक्षाचे नेते जयंतराव वानखडे, आमदार रवी राणा यांचे सचिव उमेश ढोणे तसेच युवा स्वाभिमान पक्षाचे नितीन अनानसने, हर्षल रेवने,इतर पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थितांनी वसुधाताई देशमुख यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या सामाजिक व राजकीय योगदानाची प्रशंसा केली.




आज अमरावती महानगरपालिकेच्या सभागृहात अमरावती महानगरपालिकेचे यंदाचे आर्थिक बजेट आज स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर यांनी सादर केले. यावेळी महापौर श्रीचंद तेजवानी , उप महापौर सचिन भेंडे महापालिका आयुक्त सोम्या शर्मा यांच्यासह सर्व नगरसेवकांची उपस्थिती होती.

# छत्रपती संभाजी महाराज चौकात थाटली 'दादा स्मृती' पाणपोई

प्रतिनिधी ३० मार्च

**अमरावती:** सद्या कडाक्याची ऊन तापत असून रखरखत्या उन्हाने जीवाची लाही लाही होत आहे. अशावेळी तृष्णा-तृप्तीसाठी वाटसरुंची भटकंती होऊ नये, म्हणून पाणपोई थाटण्यात येत आहे. अशाच रीतीने अमरावती शहर राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने आपल्या सामाजिक कार्याचा परिचय देत छत्रपती संभाजी महाराज चौक नवसारी रिंगरोड येथे ठदादा स्मृतीठ पाणपोई थाटण्यात आली. श्रीरामनवमीच्या पावन पर्वावर या पाणपोईचा शुभारंभ करण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते आमदार -संजय खोडके व अमरावतीच्या आमदार -सौ. सुलभाताई खोडके यांच्या मार्गदर्शनात राष्ट्रवादी युवक काँग्रेस हि अमरावती शहरात सामाजिक कार्य व विविध उपक्रम राबविण्यात अग्रणी असून महाराष्ट्र राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री लोकनेता स्व. अजितदादा पवार यांच्या स्मृतीप्रित्यर्थ ठदादा स्मृती पाणपोईठ च्या माध्यमातून अजितदादांच्या स्मृतीचे जतन करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष ऋतुराज राऊत, सामाजिक कार्यकर्ता संकेत महल्ले राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष- आकाश हिवसे, अभिमन्यू तायवाडे, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे शहर अध्यक्ष संकेत बोके, रायुकॉ शहर उपाध्यक्ष मनीष पाटील, राष्ट्रवादी युवक काँग्रेस अमरावती विधानसभा अध्यक्ष- प्रमोद धनाडे, अभिलाष नलोडे, सार्थक खोरगडे, जयेश सोनोने, प्रथमेश बोके, मनीष फाटे, सुजल तेलखडे, सागर इंगळे, अभिजित लोयटे, तेजस पोटे, धिरज तायडे, पंकज शर्मा , अक्षय पळसकर, पंकज खंडाळकर , आदेश भोकरे, ऋतुराज साबळे, वैभव व्हाडे , तौसिफ़ हुसेन, प्रणव हिवसे , सारंग देशमुख, शिवकुमार कैथवास, दीपक खंडारे, सर्वेश खेडकर, शास्वत मालपे , आदींसह राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे पदाधिकारी व सर्व सहकारी उपस्थित होते.

# अमरावती विभागात २०० तरुणांना 'टूरिस्ट गाइड' बनण्याची संधी

## ♦ पर्यटन संचालनालयातर्फे ७ दिवसांचे विनामूल्य प्रशिक्षण

प्रतिनिधी ३० मार्च

**अमरावती:** अमरावती विभागातील पर्यटन स्थळांचा विकास आणि स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी पर्यटन संचालनालयाने पुढाकार घेतला आहे. 'नमो पर्यटन कौशल्य प्रशिक्षण योजना' अंतर्गत अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम आणि बुलढाणा या पाचही जिल्ह्यांतील इच्छुक युवक-युवतींसाठी 'टूरिस्ट गाइड ट्रेनिंग' आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती पर्यटन संचालनालयाचे उपसंचालक विजय जाधव यांनी दिली आहे. या सात दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमात प्रामुख्याने पर्यटन स्थळांवर प्रभावी मार्गदर्शन करणे, आदरातिथ्य सेवा आणि पर्यटन संबंधित तांत्रिक कौशल्यांचे धडे दिले जाणार आहेत. आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर येणाऱ्या पर्यटकांना स्थानिक वारसा आणि ऐतिहासिक स्थळांची शास्त्रोक्त माहिती मिळावी, या उद्देशाने हे 'पर्यटन सुलभ मार्गदर्शक' तयार केले जात आहेत. विशेष म्हणजे, ग्वाल्हेर येथील नामांकित 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टूरिझम अँड ट्रॅव्हल मॅनेजमेंट' आणि महाराष्ट्र पर्यटन संचालनालयाचे तज्ज्ञ प्रशिक्षक हे प्रशिक्षण देणार आहेत. या प्रशिक्षणासाठी एकूण २०० उमेदवारांची निवड 'प्रथम येणाऱ्यास प्राधान्य' या तत्त्वावर केली जाईल. अर्जदार कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा आणि त्याचे वय १८ ते ४५ वर्षांच्या दरम्यान असणे आवश्यक आहे.

सिटी न्यूज सुप

## खामगाव

# स्त्री हीच सृष्टीची आधारशिला- जितेंद्रनाथ महाराज

प्रतिनिधी ३० मार्च

**शेगाव :** विश्वमांगल्य सभेच्या वतीने आयोजित दोन दिवसीय विदर्भस्तरीय मातृसंस्कार समागमचा भव्य प्रारंभ शेगाव येथील श्री संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयच्या ऑडिटोरियम हॉलमध्ये उत्साहात झाला. या समागमाचे उद्घाटन देवनाथ पीठाचे आचार्य जितेंद्रनाथ महाराज यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी बोलताना महाराजांनी स्त्रीशक्तीचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, 'स्त्री ही केवळ एक व्यक्ती नसून ती अन्नपूर्णा, दुर्गा,



सरस्वती आणि भारतमातेचे साक्षात रूप आहे. संपूर्ण सृष्टीचा आधार आणि वंशपरंपरेची वाहक ही स्त्रीच आहे.' त्यांनी स्पष्ट केले की, समाज, कुटुंब, राष्ट्र आणि विश्वाच्या उन्नतीचा पाया स्त्रीच्या संस्कारांवर उभा आहे. राजकारणी, मंत्री देश चालवतात; पण खरे राष्ट्रनिर्माते घरातील आईच असते, असे ते म्हणाले. रघुवंश, भोसले वंश यांसारख्या महान परंपरा घडविण्यामागे मातृशक्तीचे योगदान असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

कार्यक्रमाला विदर्भातील विविध भागातून महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. मातृशक्तीच्या जागृतीसाठी आणि संस्कारक्षम समाज निर्मितीसाठी हा समागम प्रेरणादायी ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला. अभियानाच्या प्रांत संयोजिका डॉक्टर अपर्णाताई कुटे यांनी शिबिराचा उद्देश मातुसंस्कार समागमाचा उद्देश आपल्या मनोगतातून व्यक्त केला. यावेळी वाशिम येथून आलेल्या संघाने विशेष प्रकारे स्टेजवर आपले प्रभुत्व दाखवत स्त्रियांनी आणि लहान लहान मुलींनी लाठीकाठी लेझीम तलवारबाजी या सर्व चित्त थरारक अशा खेळांचा प्रदर्शन केले यामुळे त्यांचा सत्कार देखील येथे करण्यात आला यावेळी जळगाव जामोद मतदारसंघाचे आमदार व माजी मंत्री संजय कुटे यांची विशेष उपस्थिती होती .

# खामगाव तालुक्यात तापमान ४० अंशावर!

## ♦ उष्माघातापासून सावध राहण्याचे आवाहन

प्रतिनिधी ३० मार्च

**खामगांव :** तालुक्यात मार्च महिन्याच्या अखेरीस उन्हाचा तीव्र कडाका वाढू लागला असून, तापमानात लक्षणीय वाढ झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून कमाल तापमान सातत्याने चढत असून, खामगाव तालुक्याचा पारा ४० अंश सेल्सिअसच्या पुढे पोहोचला आहे. पुढील दोन दिवसांत आणखी वाढण्याची शक्यता नागपूर येथील प्रादेशिक हवामान केंद्राने व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी उष्माघातापासून बचाव करण्यासाठी विशेष काळजी घेण्याचे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.

गत आठवड्यात ढगाळ वातावरणामुळे तापमानात घट झाली होती; मात्र आता पुन्हा तापमान झपाट्याने वाढू लागले आहे. दुपारच्या वेळेत उन्हाची तीव्रता अधिक जाणवत असल्याने उष्माघाताचा धोका वाढला आहे. त्यामुळे नागरिकांनी बाहेर पडताना काळणी घेणे गरजेचे बनले आहे.

### उष्माघाताची लक्षणे

उष्माघात झाल्यास डोकेदुखी, चक्कर येणे, मळमळ, उलट्या, अंगावर ताप येणे, त्वचा कोरडी व गरम होणे, हृदयाचे ठोके वाढणे अशी लक्षणे दिसू शकतात. काही प्रकरणांमध्ये व्यक्ती बेशुद्धही पडू शकते. अशा वेळी तत्काळ वैद्यकीय उपचार घेणे अत्यावश्यक आहे.

विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, गर्भवती महिला तसेच मैदानी काम करणारे कामगार यांना अधिक धोका निर्माण झाला असून, शरीरातील पाण्याची कमतरता, थकया आणि थेट उन्हात दीर्घकाळ राहणे यामुळे उष्माघात होण्याची शक्यता वाढली आहे.

### आरोग्य विभागाचे आवाहन

उन्हाचा वाढता प्रकोप लक्षात घेता नागरिकांनी सतर्क राहून आवश्यक ती काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. कोणतीही लक्षणे जाणवल्यास विलंब न करता जवळच्या आरोग्य केंद्रात संपर्क साधावा, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. उन्हाचा वाढता पारा लक्षात घेता नागरिकांनी स्वतःची आणि कुटुंबीयांची काळजी घेत सुरक्षित राहणे, हीच काळाची गरज आहे.

सिटी न्यूज अकोला

सोमवार, दि. ३० मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# गॅसबाबत तक्रार निवारणासाठी पुरवठा कार्यालय कक्ष स्थापन

**अकोला:** जिल्ह्यातील घरगुती एलपीजी गॅसच्या सुरळीत वितरणाकरिता, तसेच घरगुती गॅसचा अवैध वापर रोखण्याकरिता जिल्हा स्तरावर दक्षता व फिरत्या पथकाद्वारे तपासण्या होत आहेत. त्याचप्रमाणे, जिल्हा स्तरावर जिल्हा पुरवठा कार्यालयात स्थापन करण्यात आला आहे. त्याचा संपर्क क्र. ८०१०१५३७८० हा आहे. सद्यस्थितीमध्ये पेट्रोल,डिझेल, व घरगुती गॅस या इंधनासंदर्भात प्राप्त तक्रारींचे तातडीने निवारण होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने अकोला जिल्ह्यातील नागरिकांकडून दूरध्वनी संदेशाद्वारे प्राप्त होणा-या तक्रारींचे निवारण करण्यासाठी हा कक्ष स्थापण्यात आला आहे. तक्रार निवारण कक्षामध्ये अधिकारी, कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## डिझाइन परीक्षेत विद्यार्थी अव्वल

**अकोला :** स्थानिक रणपिसे नगर येथील बीआरडीएस अकोला शाखेत वास्तुकला आणि डिझाइनमध्ये अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनी नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजीच्या २५-२६ परीक्षेत १३ विद्यार्थी यश मिळवले. यात प्रियल जैन, साक्षी इंगोले, श्रावणी ठाकरे, दिशा दहात्रे, सतीश वाघमारे, खुशी बियाणे, आनंदी मनतकर, दिशा दरमिकर, प्राची गुप्ता, स्वरा उटागळे, शिवानी देशपांडे, रुचिता वानखडे, तनवी बनसोड यांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे अंडर ग्रॅज्युएट कॉमन एंट्रन्स एक्झाम फॉर डिझाईन या परीक्षेत शिवानी देशपांडे, अक्षता मुंडेकर, तन्वी बनसोड, आनंदी मनतकर यांना यश मिळाले. तसेच जेईई द्वितीय परीक्षेत बसेरा फातिमा, ऋचा ईप्पर, प्रशांत जाधव यांनी यश प्राप्त केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे बीआयडीएसचे संचालक भवर राठोड, केंद्रातील सर्व प्राध्यापक आणि केंद्र संचालक यांनी अभिनंदन केले.

## जनरल प्रॅक्टिशनर्स असो.ची सीएमई संपन्न

**अकोला:** येथील जी.पी.ए. असो. अकोला चे वतीने जीपीए सदस्यांसाठी ओंकोलोजीस्ट व बायपास सर्जन तज्ञ डॉ. अल्केश गुल्हाने व डॉ. पत्रलेखादास गुल्हाने यांची सी.एम.ई. नुकतीच संपन्न झाली.आर एस सभागृहात संपन्न या कार्यक्रमात अतिशय सुंदर व सोप्या भाषेतून डॉ. अल्केश गुल्हाने व डॉ. पत्रलेखादास गुल्हाने यांनी स्लाईड द्वारे मार्गदर्शन करून सर्व डॉक्टरांना वैद्यकीय मार्गदर्शन केले. डॉ. अल्केश गुल्हाने यांचे स्वागत जीपीए अध्यक्ष डॉ. सतीश उटांगळे व डॉ. पत्रलेखादास गुल्हाने यांचे स्वागत डॉ.सौ भांगडिया यांनी पुष्पगुच्छ व मानचिन्ह देऊन केले. सीएमईचे मार्गदर्शक डॉ. किशोर मालोकार यांचे स्वागत डॉ. आदित्य नानोटी यांनी केले.व जीपीए अध्यक्ष डॉ. सतीश उटांगळे यांचे स्वागत डॉ. राजेश काटे यांनी केले. प्रास्ताविकात डॉ. सतीश उटांगळे यांनी जी.पी.ए. ची पुढील भूमिका व कार्य यांची माहिती दिली.कार्यक्रमात डॉ मनोहर घुगे यांची कविता विद्यापीठ अभ्यास क्रमात समाविष्ट करण्यात आल्याबद्दल त्यांचा सत्कार डॉ गुल्हाने, डॉ मालोकार व डॉ उटांगळे यांनी संयुक्त पणे केला.

# समाज बुवाबाजीस बळी पडणार नाही याचाही प्रचार कीर्तनकारांनी करावा- सुशील महाराज वणवे

प्रतिनिधी ३० मार्च

**अकोला:** बुवाबाजीच्या नादास लागून घडत असलेले भयंकर किस्से समाजमन सुन्न करणारे आहेत. यास आळा घालण्यासाठी आता समाजातील चळवळ उभारणाऱ्या संघटनांनी समाज जागृती करण्याची गरज निर्माण झाली आहे. सोबतच किर्तन, प्रवचन करणाऱ्या महाराजांनी सुद्धा केवळ देव भक्ती पुरते मर्यादित न राहता या विषयांवर सुद्धा समाज जागृतीचे कार्य करावे असे प्रतिपादन शेगाव येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आश्रमाचे संचालक ह. भ. प. सुशील महाराज वणवे यांनी केले.



स्थानिक खेडकर नगर मधील महारुद्र हनुमान मंदिरात हनुमान जयंती निमित्त सुरू असलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी नॅबचे अकोला जिल्हाध्यक्ष प्रदीप खाडे यांनी प्रास्ताविक केले. जवाहर नगर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आश्रमाचे संचालक भानुदास कराळे यांनी सुद्धा आपले मनोगत व्यक्त करून राष्ट्रवंदना सादर केली.

सुशील महाराज वणवे म्हणाले, आज समाजास राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगेबाबा यांच्यासारख्या महान संतांची गरज असून या श्रेणीतील खरे संतच समाजास योग्य दिशा दाखवू शकतात. कीर्तनात हार्मोनियम वादक व गायक गजाननराव ढोके, गायक महेंद्र ठोंबे, तबलावादक श्रीकृष्ण बराटे, कृष्णा वणवे यांचीही उत्तम साथ संगत लाभली. याप्रसंगी सुधाकर अंबुसकर यांचे हस्ते वनवे महाराजांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचलन व आभार प्रदर्शन प्रदीप खाडे यांनी केले.

# निरोगी आरोग्य हीच खरी संपत्ती- डॉ. विनायक देशमुख

प्रतिनिधी ३० मार्च

**अकोला:** ज्येष्ठ नागरिक संघाची पाक्षिक सभा बी.आर. हायस्कूल येथे संपन्न झाली.या सभेत विशेष मार्गदर्शक म्हणून ज्येष्ठ बालरोग तज्ञ डॉ. विनायकराव देशमुख उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात नेहमीच्या प्रथेप्रमाणे दीपप्रज्वलन व खरा तो एकची धर्म या प्रार्थनेने करण्यात आली.प्रार्थना सौ. दिशा उद्गीरकर यांनी सादर केली.यावेळी संघाचे अध्यक्ष रमेश बाहेती यांनी डॉ विनायकराव देशमुख यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार केला.कार्यक्रमात गत महिन्यात ज्या सदस्यांचे जन्मदिन संपन्न झाले त्या जेष्ठ नागरिक बंधुभगिनींचा सत्कार करण्यात आला. यात



विशेष म्हणजे संघाचे अध्यक्ष रमेश बाहेती व महिला समितीच्या अध्यक्षा सौ दिपाली वैद्य यांचाही सत्कार करण्यात आला.कार्यक्रमात डॉ. विनायकराव देशमुख यांनी साध्या सोप्या भाषेत जेष्ठांच्या विविध आरोग्यविषयक समस्यांवर काय उपाय करावेत व सुखी आनंदी जीवन कसे जगावे या विषयी उद्बोधन केले. अनेकांनी त्यांना विविध समस्यां बद्दल विचारणा केली, त्या सर्व समस्यांचे निराकरण डॉ देशमुखांनी अगदी सोप्या भाषेत समजाऊन केले. प्रास्ताविक,पाहुणे परिचय व संचालन संघाचे सचिव प्रा.मोहन गद्रे यांनी तर उपाध्यक्ष मोहनशास्त्री जलतारे यांनी आभार मानलेत.महिला समिती अध्यक्षा सौ दिपाली वैद्य यांनी सादर केलेल्या पसायदानाने एका यशस्वी कार्यक्रमाची सांगता झाली.

# कॉपर चोरी प्रकरणी कारवाई

प्रतिनिधी ३० मार्च

**अकोला:** बार्शीटाकळी पोलीस स्टेशन हददीतील मेघा इंजीनियरींगचे गोडावुन मधुन कॉपर केबल चोरी प्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेच्या वतीने १२ तासात कारवाई केली. २ आरोपींना अटक करून ७,५०,०००/- रू. चे केबल जप्त केले.

दिनांक २८/०३/२०२६ रोजी जलालाबाद ता. बार्शीटाकळी येथील मेघा इंजीनियरींग अ?ण्ड इन्फा लि. चे सोलार प्लांट इस्टालेशन गोडावुन येथुन एक मोठा ड्रमचा आर्थीग केबल ७० स्केअर एम एम किंमत ६,५०,०००/- रूपये, तसेच डि.सी. केबल ४ स्केअर एम एम लहान ड्रम किंमत २,२५,०००/- रूपये असा एकुण ८,७५,०००/- रूपये चा सोलार कॉपर केबल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरी केल्याची तक्रार दिल्याने पो. स्टे बार्शिटाकळी अप नं. २७०/२०२६ कलम ३०५ (ए) भा.न्या.सं. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी पोलिस निरीक्षक शंकर शेळके यांना सोलर केबल साहित्य चोरीचा गुन्हा उलगडा करण्याचा सुचना केल्याने स्थानीक



गुन्हे शाखा पथकाने समांतर तपास करून सदर गोडावुन मध्ये काम करणारा आरोपी नामे संदीप उमेश राय वय २७ वर्षे रा. सारीपुर जि. बक्सार बिहार याने सोलार केबल विकल्याचे विचारपुस व तांत्रीक माहीती वरून निष्पण झाले त्यास विचारपुस केली असता त्याने सदर माल शहेजाद बेग सलीम बेग वय ३२ वर्षे रा. बादशह नगर पातुर यास विकल्याचे सांगितले त्यावरून शहेजाद बेग याचे कडुन गुन्हयातील चोरी गेलेला मुददेमाल एक मोठा ड्रमचा आर्थीग केबल ७० स्केअर एम एम किंमत ६,५०,०००/- रूपये व दोन पॅकिंग असलेले डि.सी. केबल ४ स्केअर एम एम लहान डूम ज्याची किंमत १,००,०००/- रूपये तसेच ०५ खाली ड्रम असा एकुण ७,५०,०००/- रूपयेचा मुद्देमाल पातुर येथुन हस्तगत करण्यात आला व आरोपी व मुददेमाल पो.स्टे. बार्शीटाकळी येथे हस्तांतरीत करण्यात आला असुन प्रकरणाचा पुढील तपास पोउपनि, बाळु पवार, पोलिस स्टेशन बार्शीटाकळी हे करीत आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक श्री. अर्चित चांडक, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. चंद्रकांत रेडडी, पो. नि. शंकर शेळके, स्थानिक गुन्हे शाखा, अकोला यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि. गोपाल जाधव, ग्रेड पोउपनि. दशरथ बोरकर, सफौ, गणेश पांडे, पोहवा. गोकुळ चव्हाण, उमेश पराये, पो. कॉ. अन्सार शेख, पो. कॉ. स्वप्नील खेडकर, आकाश मानकर, चालक मनीष ठाकरे यांनी पार पाडली.

# हिवरखेड व खंडाळा केंद्राची शिक्षण परिषद संपन्न

प्रतिनिधी ३० मार्च

**हिवरखेड:** कस्तुरबा गांधी विद्यालयात हिवरखेड व खंडाळा केंद्राची शिक्षण परिषद झाली. शिक्षण परिषदेला मार्गदर्शन करण्यासाठी अकोला जिल्हा परिषदेचे प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी रतनसिंग पवार, तेल्हारा पंचायत समितीचे विस्तार अधिकारी रविंद्र चौथमल,सहदेवराव भोपळे विद्यालयाचे प्राचार्य संतोष राऊत, कस्तुरबा गांधी विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रशांत खंडारे,हिवरखेड केंद्राचे केंद्र प्रमुख गजानन राऊत,खंडाळा केंद्राचे केंद्र प्रमुख गोपाल मोहे उपस्थित होते.




सर्व प्रथम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन,हारार्पण व उपस्थितांचे स्वागत करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. गजानन राऊत यांनी प्रास्ताविकातून शिक्षण परिषदेची रुपरेषा मांडली,

विस्तार अधिकारी रविंद्र चौथमल यांनी आपल्या मार्गदर्शनात शासनाच्या विविध योजना व त्यांची अंमलबजावणी, स्कॉलरशिप मानके कशी भरावीत, विद्यार्थी सुरक्षितता याविषयी माहिती दिली.

शिक्षणाधिकारी रतनसिंग पवार यांनी जिल्हा परिषद शाळांमध्ये पट वाढवण्याचे आव्हान केले.शिक्षक हा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करुन त्यांचे जीवन बदलू शकतो व अनेक पिढ्यांचा उद्धार करु शकतो.

शिक्षकांसमोर अनेक कामे आहेत परंतू या सर्व कामांना ओझे न मानता आनंदाने काम करणा-या त्याच बरोबर गुणवत्ता टिकवणा-या गुरुजनांचा मला अभिमान वाटतो असे प्रतिपादन पवार साहेब यांनी केले.

शिक्षण परिषदेला सुलभक म्हणून उमेश तिडके, गोपाल गि-हे, रामदास खडसे,जयश्री लाटे, फैजान सर, मंगेश पवार, गावंडे यांनी मार्गदर्शन केले. शिक्षण परिषद मध्ये शिक्षकांशी हितगुज करुन पवार साहेब यांनी समाधान व्यक्त केले. शिक्षण परिषदेचे सुत्र संचालन सहायक शिक्षक संजय वानखडे यांनी तर आभार प्रदर्शन गोपाल मोहे यांनी व्यक्त केले.

# निंबा फाटा परिसरात गुटखा विक्री जोमात

प्रतिनिधी ३० मार्च

**हातरुण:** राज्यात गुटखा विक्रीवर कडक बंदी असूनही निंबा फाटा, हातरूण,अंदुरा, उरळ भागात दिवसाढवळ्या गुटख्याची खुलेआम विक्री सुरू असल्याचे धक्कादायक वास्तव आहे. गुटखा आरोग्याला घातक असून सुध्दा अन्न-औषध प्रशासनाचे जाणूनबुजून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून जोर धरू लागला आहे. ग्रामीण भागांतील विविध पानटपऱ्या, किराणा दुकाने तसेच या परिसरातही गुटखा, सुगंधी पानमसाला व प्रतिबंधित तंबाखू सहज उपलब्ध आहे.



व तसेच डिलर निंबा फाटा परिसारातील खेडेपाडयात वाटप करीत आहेत. एखाद्या वेळेसच शासांकडून कारवाई झाल्याचे दाखवले जाते. मात्र, त्या केवळ दिखाऊ ठरत असून गुटखा चोरटी वाहतूक व तस्करी आजही जोमात सुरू असल्याचे स्पष्ट दिसून येते. या अवैध व्यवसायामागे मुख्य तस्कर कार्यरत असल्याची शहरात व परिसारात चर्चा जोरदार सुरू आहे. विशेष म्हणजे त्याच्यावर अद्याप कोणतीही ठोस व निर्णायक कारवाई झालेली नसल्याने संबंधित अधिकारी गुटखा विक्रेत्यावर कारवाई का करीत नाही असा प्रश्न समोर येत आहे. याला आळा घालण्यासाठी पावले उचलली जावी अशी मागणी आहे.

# अमिनपुर येथील नागरिकांच्या आमरण उपोषणाचा तिसरा दिवस!

## ♦ सरपंच, ग्रामसेवक व ग. वि.अधिकारी यांनी उपोषणाकडे फिरवली पाठ!

प्रतिनिधी ३० मार्च

**अकोट:** मुंडगाव येथील गट ग्रामपंचायत मधील अमीनपूर समाज मंदिराच्या मागच्या खुल्या जागेच्या ८ अ मिळण्याबाबतच्या प्रलंबित मागणीसाठी येथील ६ महिला व २ पुरुषांनी पाण्याचा घोट न घेता बेमुदत आमरण उपोषणास २७ मार्च रोजी पासून ग्रामपंचायत कार्यालय मुंडगाव समोर सुरूवात केली. मात्र गेल्या ३ दिवसांपासून सरपंच, ग्रामसेवक,व गटविकास अधिकारी यांना येथील उपोषण कर्ते महिला व पुरुष यांना भेटण्यासाठी पाठ फिरवली असे दिसत आहे .या भ्रष्टाचाराची व सरपंच व ग्रामसेवक यांच्या विरोधात सुरू असलेले उपोषण न्याय मिळाल्या शिवाय सोडणार नसल्याचे येथील उपोषण कर्त्या महिला व पुरुषांनी सांगीतले आहे. सदर आमरण उपोषणाला बसण्याच्या पूर्वसूचना सुद्धा संबंधित ग्रामपंचायत मुंडगाव व गटविकास अधिकारी अकोट, यांच्या सह अनेक वरीष्ठांना देण्यात आल्या आहेत. परंतु हेतुपुरस्सर ग्रामपंचायत सरपंच व ग्रामसेवक व



गटविकास अधिकारी यांनी आमच्या तक्रारी/निवेदनाकडे दुर्लक्ष केले आहे.

गट ग्रामपंचायत मुंडगाव च्या कार्यक्षेत्रात असणारे अमिनपुर या ठिकाणी जिल्हा परिषद अकोला च्या समाजकल्याण विभागामार्फत बौद्ध समाजासाठी समाज मंदिराचे बांधकाम करण्यात आले होते. सदर समाज मंदिरात सामाजिक पूरक उपक्रम शांतीदूत बुद्धविहार चॅरीटेबल ट्रस्ट व आधीचे सुकेशिनी महिला मंडळ च्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षापासून राबवल्या जातात. तसेच समाजमंदिराच्या मागील संपूर्ण मोकळ्या जागेची देखभाल सुद्धा महिला मंडळ गेल्या कित्येक वर्षापासून करत आहे. सामाजिक आणि धार्मिक कार्यक्रम सुध्दा राबवत असताना त्यांना जागेसंबधी इथे नेहमीच अडचण जाणवते.

त्याच अनुषंगाने ग्राम पंचायतच्या अखत्यारीत येत असलेल्या अमीनपुर येथील समाज मंदिरमागील खुली मोकळी जागा, त्या जागेचा रीतसर ८अ मिळावा या संबंधी सतत ग्रामपंचायत सरपंच व ग्रामसेवक यांच्या कडे पाठपुरावा केलेला आहे.

ज्यासंबंधी सतत कार्यालयांना विनंती अर्जावर संबंधितांनी कुठल्याही प्रकारची आज पर्यंत कार्यवाही केली नाही.उलटपक्षी ज्या जागेसंबंधी ८ अ ची मागणी होती. त्या जागेवर येथील ग्रामपंचायत सरपंच व ग्रामसेवक यांनी गावात जातीय सलोखा बिघडावा यासाठी त्रयस्थ व्यक्तीला बांधकाम करण्यास मदत केली. त्या व्यक्तीला पाठिशी घालून ग्रामपंचायतीने सदर ठिकाणचा सामाजिक सलोखा धोक्यात आणला आहे.या बाबत पण कोणतीच ठोस कारवाई उपोषणाला बसणे पर्यंत केली नाही. तसेच उपोषणाच्या पूर्वसूचना सुद्धा देण्यात आल्या वरही येथील नागरिकांच्या समस्या व मागण्या कडे दुर्लक्ष केले असुन शांतीदूत बुद्धविहारच्या मागील पूर्ण अतिक्रमित बांधकाम काढण्यात यावे.त्या जागेचा रीतसर ८ अ शांतीदूत बुद्धविहार चॅरीटेबल ट्रस्ट च्या नावे देण्यात यावा अशी मागणी सुद्धा करण्यात आली आहे.सदर उपोषणाला ३ रा दिवस असुन या कडे अद्याप ही प्रशासनाने किंवा शासकीय अधिकारी यांनी दखल घेतली नाही.सदर उपोषणाला

मंगला पोहोरकर, सिंधुबाई सोनोने ,निताबाई गवई, मालताबाई पिंपळे, कमलाबाई सरकटे, सपना पुंडकर, ह्या ६महिला तर तोताराम सरकटे,सुरेश सरकटे हे दोन पुरुष बसले आहेत.ग्रामपंचायत प्रशासन व अधिकारी यांनी उपोषणाची दखल न घेतल्यास नाईलाजाने ग्रामपंचायत कार्यालय मुंडगाव येथे काही उपोषण कर्त्यांना आत्मदहन करावे लागेल.असा इशारा सुद्धा देण्यात आला आहे.या उपोषणा बाबत सरपंच व ग्रामसेवक गप्प का असा प्रश्न सुध्दा उपस्थित करण्यात येत आहे.तेव्हा वरिष्ठांनी यांची दखल घेऊन उपोषणाला बसलेल्या महिला व पुरुषांना न्याय द्यावा अशी मागणी येथील नागरिकांनी केली आहे.या उपोषणाला त्रिमूर्ती प्रतिष्ठान मुंडगाव चे अध्यक्ष शेषराव सरकटे सह सर्व पदाधिकारी यांनी जाहीर पाठिंबा दिला आहे.

# सातेगाव ग्रामपंचायतींच्या वतीने पोलीस दलात निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार

## ♦ संपूर्ण गावांमधून शुभेच्छांचा वर्षाव

प्रतिनिधी ३० मार्च

**अकोट:** अंजनगाव सुर्जी तालुक्यातील सातेगाव ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने संचालित डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्पर्धा परीक्षा अभ्यासिका केंद्रातील विद्यार्थ्याने महाराष्ट्र पोलीस दलात अकोला ग्रामीण येथे निवड मिळविल्याबद्दल ग्रामपंचायतीच्या वतीने भव्य व जाहीर सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. दिनांक २८ मार्च २०२६ रोजी पार पडलेल्या या कार्यक्रमास गावकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

१४ एप्रिल २०२५ रोजी स्थापन झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्पर्धा परीक्षा अभ्यासिका केंद्राने अवघ्या एका वर्षात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या अभ्यासिकेतील विद्यार्थी सय्यद फहीम सय्यद हुसेन यांची महाराष्ट्र पोलीस दलात निवड झाल्याने सातेगाव ग्रामपंचायत तसेच संपूर्ण गावासाठी हा अभिमानाचा क्षण ठरला आहे. त्यांच्या या यशाबद्दल शाल,



श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

अभ्यासिका यशस्वीपणे चालवण्यासाठी सरपंच छायाताई राजेंद्र वानखडे व भानुदास वानखडे यांचे विशेष सहकार्य लाभत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या सत्कार समारंभास सातेगावच्या सरपंच छायाताई राजेंद्र वानखडे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम पार पडला. यावेळी उपसरपंच पुरुषोत्तम काळे, ग्रामपंचायत सदस्य संजय हाडोळे, कपील देशमुख, अतुल काळे, संजय गावंडे, बाळा गावंडे, अर्चना संजय गावंडे,राजेंद्र वानखडे, श्याम इंगोले यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच ग्रामविकास अधिकारी जगदीश गावंडे, आणि अभ्यासिकेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमात मान्यवरांनी मार्गदर्शन करताना ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी अशा अभ्यासिका केंद्रांची निर्मिती ही काळाची गरज असल्याचे सांगितले. या केंद्रातून अनेक विद्यार्थी स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवून शासकीय सेवेत स्थान मिळवतील, असा विश्वास राजेंद्र वानखेडे यांनी व्यक्त केला. सय्यद फहीम यांच्या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळणार असून, त्यांच्या मेहनतीचे सर्वत्र कौतुक करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भानुदास वानखडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन कुमारी तेजस्विनी सुभाष निर्मळ यांनी मानले.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

सोमवार, दि. ३० मार्च २०२६

https://epaper.citynewssuperfast.com


# 'शिवशंभो गर्जना'ला रिकाम्या खुर्च्यांची साथ; यवतमाळ महोत्सवाकडे नागरिकांची पाठ




प्रतिनिधी ३० मार्च

**यवतमाळ :** यवतमाळ महोत्सवांतर्गत आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात प्रसिद्ध कलाकार अभिजित जाधव आणि अमू जाधव यांचा 'शिवशंभो गर्जना' हा गीतगायनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. संत, महापुरुष आणि राष्ट्रपुरुषांच्या जयघोषाने वातावरण भारावून गेले; मात्र या कार्यक्रमाला अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने रिकाम्या खुर्च्यांनीच कार्यक्रमाचा 'आस्वाद' घेतल्याची चर्चा जिल्ह्यात रंगली आहे.

कृषी विज्ञान केंद्र मैदान, वाघापूर येथे झालेल्या या कार्यक्रमाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. सध्या शहरात सुरू असलेल्या कृषी महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर हा सांस्कृतिक उपक्रम आयोजित करण्यात आला होता. मात्र, प्रेक्षकांची अत्यल्प उपस्थिती लक्षवेधी ठरली.



दरम्यान, महोत्सवाच्या आयोजनावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या कृषी महोत्सवात प्रत्यक्षात शेतकऱ्यांना उपयुक्त अशी साधने किंवा माहिती उपलब्ध नसल्याची टीका होत आहे. परिणामी, जिल्ह्यातील शेतकऱ्यांनीही या महोत्सवाकडे पाठ फिरवल्याचे चित्र दिसून आले.

काही ठेकेदारांना लाभ होईल अशा पद्धतीने आयोजन केल्याची चर्चा देखील रंगू लागली आहे. प्रशासनाच्या भूमिकेबाबत नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत असल्याचे बोलले जात आहे.

एकंदरीत, भव्य नियोजन असूनही प्रतिसादाचा अभाव आणि आयोजनावर उठलेले प्रश्न यामुळे यवतमाळ महोत्सव सध्या चर्चेचा विषय ठरत आहे.

# ज्वारीच्या पिकात बिबट्याचा मुक्काम

## वन विभागाचे बचाव पथक घटनास्थळी दाखल : महागाव परिसरात भीतीचं सावट

प्रतिनिधी ३० मार्च

**महागाव :** दत्तोबा टेकडी लगतच्या शेतशिवारात बिबट्याने पाळीव कुत्र्याची शिकार करून ज्वारीच्या दाट पिकातच ठाण मांडल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकारामुळे महागाव परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, वन विभागाचे बचाव पथक घटनास्थळी दाखल झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शेतकरी दीपक साहेबराव नरवाडे हे सकाळी अकराच्या सुमारास नेहमीप्रमाणे आपल्या शेतात गेले असता, ज्वारीच्या पिकाजवळ त्यांचा पाळीव कुत्रा मृतावस्थेत आढळून आला. कुत्र्याचा मृतदेह पाहून संशय आल्याने त्यांनी परिसराची पाहणी केली असता, जमिनीवर बिबट्याच्या पाऊलखुणा स्पष्टपणे दिसून आल्या.

घटनेची माहिती त्यांनी तत्काळ आपल्या भावाला व इतर शेतकऱ्यांना दिली.

परिस्थितीचे गांभीर्य ओळखून काही शेतकरी झाडावर चढले, तर काहींनी सुरक्षित अंतर ठेवून ज्वारीच्या पिकाच्या दिशेने पाहणी सुरू केली. यावेळी बिबट्या दाट पिकात दबा धरून बसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. बिबट्या दिसताच शेतकऱ्यांमध्ये एकच घबराट उडाली.

यानंतर वन विभागाला कळविण्यात आले. माहिती मिळताच वन विभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले असून, बिबट्याला सुरक्षितरीत्या जेरबंद करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान, नागरिकांनी शेतात किंवा दाट पिकांमध्ये एकटे जाणे टाळावे, तसेच सतर्क राहावे, असे आवाहन वन विभागाने केले आहे.



या घटनेमुळे महागाव व परिसरातील शेतकरी आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# पैनगंगा काठच्या गावांमध्ये जलस्त्रोत आटले

## ब्राह्मणगाव तहानले; इसापूर धरणाचे पाणी सोडण्याची मागणी

प्रतिनिधी ३० मार्च



**उमरखेड :** उन्हाळ्याची तीव्रता वाढताच तालुक्यातील ब्राह्मणगावसह पैनगंगा नदीकाठच्या अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई तीव्र झाली आहे. स्थानिक जलस्त्रोत पूर्णपणे आटल्याने नागरिकांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. इसापूर धरणात पाणीसाठा उपलब्ध असूनही जिल्हाधिकारी कोट्यातून पिण्यासाठी आरक्षित पाणी अद्याप सोडण्यात आले नाही.

दरवर्षीप्रमाणे यंदाही उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच पाणीटंचाईचे संकट उभे ठाकले आहे.

फेब्रुवारी महिन्यात सोडले जाणारे पिण्याचे पाणी यंदा मार्च अखेरपर्यंतही न सुटल्याने परिस्थिती अधिकच बिकट बनली आहे. १९ मार्च रोजी सिंचनासाठी पाणी सोडण्यात आले; मात्र पिण्यासाठी राखीव पाणी प्रलंबितच राहिले आहे.

९ मार्च रोजी दिलेल्या लेखी निवेदनानंतरही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही, अशी तक्रार ग्रामस्थांनी केली आहे. ब्राह्मणगाव येथील एसकेएफ गायपांदण नाल्यात तसेच पैनगंगा नदीपात्रात पाणी सोडल्यास परिसरातील गावांना मोठा दिलासा मिळू शकतो. मात्र जिल्हा परिषदेची पाणीकर थकबाकी असल्यामुळे उर्ध्व पैनगंगा पाटबंधारे विभागाने पाणीपुरवठा रोखल्याची माहिती समोर येत आहे. राष्ट्रीय किसान मोर्चाचे प्रदेश कार्याध्यक्ष चक्रधर पाटील देवसरकर यांनी उमरखेड उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन देऊन तातडीने पाणी सोडण्याची मागणी केली आहे. तसेच आमदार किसनराव वानखेडे यांनीही हा मुद्दा विधानसभेत उपस्थित केला होता.

> ■ पैनगंगा नदीपात्र कोरडे असतानाही मोठ्या प्रमाणावर रेती उत्खनन सुरू असल्याचा आरोप होत आहे. नदीपात्रात खड्डे पाडून पर्यावरणाचा ऱ्हास केला जात असल्याची टीका होत असून, अशा परिस्थितीत पाणी सोडण्यात होणारा विलंब हा कृत्रिम पाणीटंचाईला कारणीभूत ठरत असल्याचा सवाल उपस्थित केला जात आहे.

दरम्यान, गावोगावी पाणीटंचाईचे स्वरूप दिवसेंदिवस गंभीर होत असताना प्रशासनाच्या दिरंगाईमुळे नागरिक व पशुपक्ष्यांवर पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ आली आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी कोट्यातील आरक्षित पाणी तातडीने सोडावे, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

# सामाजिक बांधिलकी; रवि जाधव यांनी दिला भावंडांना आधार

प्रतिनिधी ३० मार्च

पुनित मजेठीया

**आर्णी :** तालुक्यातील बोरगाव दाभडी येथे घडलेली एक हृदयस्पर्शी घटना सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. गेल्या सुमारे १५ वर्षांपासून प्रमोद श्रावण जाधव व संगीता श्रावण जाधव हे दोघेही गंभीर मानसिक आजाराने त्रस्त होते. त्यांच्या अवस्थेमुळे दैनंदिन जीवन जगणेही कठीण झाले होते. अनेकदा घरातून निघून जाणे, दिवसन्‌दिवस बेपत्ता राहणे अशा प्रकारांमुळे कुटुंबीयांची चिंता वाढली होती.

वडिलांचे छत्र नसल्याने आईवरच संपूर्ण जबाबदारी होती. रोजंदारी करून उदरनिर्वाह करत असताना दोन मनोरुग्ण मुलांचा सांभाळ करणे तिच्यासाठी अत्यंत कठीण बनले होते. मदतीसाठी तिने अनेक लोकप्रतिनिधींकडे धाव घेतली; मात्र ठोस प्रतिसाद मिळाला नाही, अशी खंत व्यक्त केली जात होती.



दरम्यान, ही बाब प्रहार जनशक्ती पक्षाचे तालुकाप्रमुख रवि जाधव यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी तत्काळ पुढाकार घेतला. कोणतीही अपेक्षा न ठेवता त्यांनी या दोघांसाठी योग्य उपचार व निवाऱ्याची व्यवस्था करण्याचा ध्यास घेतला. जिल्हाभर पाठपुरावा करत अखेर दोघांनाही यवतमाळ येथील नंदादीप फाउंडेशनमध्ये दाखल करण्यात आले.

या संस्थेत त्यांना मोफत निवास, अन्न, वस्त्र तसेच वैद्यकीय उपचारांची सुविधा उपलब्ध झाली आहे. त्यामुळे दीर्घकाळ अडचणीत असलेल्या कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे.

या घटनेमुळे रविभाऊ जाधव यांच्या सामाजिक बांधिलकीची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे. गरजू, वंचित आणि आजारी नागरिकांसाठी तत्परतेने उभे राहणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख अधिक दृढ होत आहे. आर्णी तालुक्यातील नागरिकांनी त्यांच्या कार्याचे कौतुक करत भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.

आजच्या बदलत्या राजकीय वातावरणात निस्वार्थीपणे समाजासाठी काम करणारे नेतृत्व दुर्मिळ होत असताना, अशा कृतींमुळे समाजात विश्वास आणि आशा निर्माण होत असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

# यवतमाळ आयडलचे थाटात उद्घाटन

प्रतिनिधी ३० मार्च

**यवतमाळ :** महात्मा ज्योतिराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त समता पर्व प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या "यवतमाळ आयडल" या विदर्भस्तरीय संगीत स्पर्धेचा उद्घाटन सोहळा मोठ्या उत्साहात व दिमाखदार वातावरणात पार पडला. संविधान चौक येथील लॉर्ड बुद्धा सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाने सांस्कृतिक वातावरणाला एक वेगळीच रंगत दिली.

ही स्पर्धा दिनांक ९ एप्रिल ते १३ एप्रिल २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आली असून विदर्भातील विविध भागातून मोठ्या संख्येने स्पर्धक सहभागी होत आहेत. उद्घाटन समारंभाचे अध्यक्षस्थान समता पर्व प्रतिष्ठानचे अध्यक्ष नारायण थूल यांनी भूषविले.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून प्रमोदिनी रामटेके, उमेश मेश्राम, ॲड. रामदास राऊत, माधुरी वाळके, हेमंत कुमार कांबळे, धर्मपाल भितकर, काजल तायडे, प्रा. विजय डोंगरे, बळीराम अडागळे, रवी बावनगडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून स्पर्धकांना प्रोत्साहन देत संगीत क्षेत्रात प्रगती करण्यासाठी प्रेरित केले.

या स्पर्धेमध्ये सहभागी स्पर्धकांचे परीक्षण धीरेंद्र गावंडे (कारंजा लाड) व संगीत तज्ञ शीला गायकवाड यांनी अत्यंत बारकाईने केले. स्पर्धकांच्या सुरेल सादरीकरणाने उपस्थित प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. विजय डोंगरे, प्रतिभा दातार, रीना वानखडे, हर्षाली बोडके व शुभम वाळके यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या नियोजनबद्ध कार्यामुळे उद्घाटन सोहळा अत्यंत सुरळीत व यशस्वीपणे पार पडला.

यवतमाळ आयडलच्या माध्यमातून नवोदित गायकांना व्यासपीठ उपलब्ध होत असून या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. आगामी दिवसांत स्पर्धेच्या पुढील फेऱ्यांमध्ये अधिक रंगत येणार असल्याची उत्सुकता संगीतप्रेमींमध्ये पाहायला मिळत आहे.

# वन्यप्राणी पाण्याच्या शोधात गावांकडे

प्रतिनिधी ३० मार्च

**यवतमाळ :** जंगलात वन्यप्राण्यांची तहान भागविण्यासाठी पाणवठे उपलब्ध असल्याचा दावा वनविभागाकडून केला जातो. मात्र, त्यात पाणीच राहत नसल्याने वन्यप्राणी तहान भागविण्यासाठी गावांकडे धाव घेताना दिसत आहे. ग्रामीण भागात वन्यजीव व मानवी संघर्ष तीव्र होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तलावाशेजारी वन्यप्राणी पाणी पिण्यासाठी येत असल्याची संधी साधून शिकारीही आपला डाव साधण्याच्या मानसिकतेत असल्याची चर्चा आहे. वन्यजीवाला वाचविण्यासाठी जंगलात पाण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

# महागावात विकासाला गती; कोट्यवधींचा निधी मंजूर

## दलित वस्ती व मूलभूत सुविधांवर भर

प्रतिनिधी ३० मार्च

**महागाव :** शहरातील दलित वस्तीसह विविध मूलभूत विकास कामांसाठी राज्य शासनाकडून कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. उपनगराध्यक्ष प्रमोद भरवाडे, माजी नगराध्यक्षा करूणा नारायण शिरबिरे आणि नगरसेवक सुजितसिंह ठाकुर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा निधी उपलब्ध झाल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

महागाव नगरपरिषदेत सत्तांतरानंतर विकासकामांना वेग आला असून शहरातील दलित वस्ती, समाजकल्याण शाळेकडे जाणारा रस्ता, घनकचरा व्यवस्थापन तसेच जलशुद्धीकरण केंद्राच्या संरक्षक भिंतीसाठी निधी मिळावा, यासाठी मागील तीन वर्षांपासून प्रयत्न सुरू होते. निवेदनांच्या माध्यमातून शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आला होता.

नुकत्याच झालेल्या घडामोडीनंतर आमदार किसनराव वानखेडे आणि भाजप जिल्हा समन्वयक नितीन भुतडा यांनीही या मागणीची दखल घेत शासनाकडे निधी मंजुरीसाठी पुढाकार घेतला. त्यानुसार अण्णाभाऊ साठे दलित वस्ती योजनेअंतर्गत २ कोटी ७० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यामध्ये प्रभाग क्रमांक १० साठी १ कोटी ४९ लाख, प्रभाग क्रमांक ६ साठी ९१ लाख आणि प्रभाग क्रमांक १७ साठी ३० लाख रुपयांची कामे हाती घेतली जाणार आहेत. याशिवाय शहरातील इतर विकास कामांसाठी सुमारे ७ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. स्वच्छ भारत अभियानांतर्गत घनकचरा व्यवस्थापनासाठी १ कोटी २६ लाख रुपये, प्रभाग क्रमांक १० मधील जलशुद्धीकरण केंद्राच्या संरक्षण भिंतीसाठी ४० लाख रुपये तसेच फुलसावंगी रस्त्यावरील शासकीय विश्रामगृहापासून समाजकल्याण शाळा व परिसरातील शाळांकडे जाणाऱ्या रस्त्याच्या बांधकामाचा समावेश आहे.





एकाच वेळी मोठ्या प्रमाणात निधी मंजूर झाल्याने महागाव शहरातील विकासाला चालना मिळणार असून नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# शिला कदम यांचा 'स्पंदने हृदयाची' काव्यसंग्रह प्रकाशित

प्रतिनिधी ३० मार्च

**उमरखेड :** येथील नवोदित कवयित्री शिला सुरेश कदम यांच्या 'स्पंदने हृदयाची' या पहिल्याच काव्यसंग्रहाचे प्रकाशन व्हिएतनाम देशात दिमाखदार वातावरणात पार पडले. जागतिक आंबेडकरी साहित्य महामंडळाच्या वतीने आयोजित सहाव्या विश्व आंबेडकरी साहित्य संमेलनात हा सोहळा पार पडला.




व्हिएतनाममधील ए-२५ लक्झरी हॉटेलच्या भव्य सभागृहात आयोजित कार्यक्रमात सुप्रसिद्ध नाटककार डॉ. सुनील रामटेके यांच्या अध्यक्षतेखाली हा प्रकाशन सोहळा झाला. ज्येष्ठ कथाकार प्राचार्य डॉ. नागनाथ पाटील यांनी उद्घाटन केले. स्वागताध्यक्ष म्हणून समाजशास्त्रज्ञ डॉ. जगन कराडे उपस्थित होते. महामंडळाचे अध्यक्ष प्रा. दीपककुमार खोब्रागडे, उपाध्यक्ष व संमेलन संयोजक प्रा. डॉ. अनिल काळबांडे, प्राचार्य वैशाली प्रधान, प्राचार्य राहुल मस्के, प्रा. ज्योती काळबांडे, सुरेश कदम व बाळासाहेब सरसमकर यांच्या हस्ते काव्यसंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले.

ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबात वाढलेल्या शिला कदम यांच्या लेखनप्रवासाला सामाजिक जाणीवा व संस्कारांची जोड लाभली. त्यांच्या पती सुरेश कदम यांचा सामाजिक कार्याशी असलेला संबंध आणि घरातील प्रेरणादायी वातावरण यामुळे त्यांच्या कवितेला आकार मिळाल्याचे मत प्रा. डॉ. अनिल काळबांडे यांनी व्यक्त केले.

या काव्यसंग्रहाला राज्यशास्त्र अभ्यासक प्रा. ज्योती काळबांडे यांची प्रस्तावना लाभली असून शिवइतिहास अभ्यासक चंद्रशेखर शिखरे यांनीही मार्गदर्शन केले आहे. यापूर्वी विविध वृत्तपत्रे तसेच 'मराठा मार्ग' मासिकात त्यांच्या कविता प्रकाशित झाल्या आहेत. ग्रामीण पार्श्वभूमीतून आलेल्या कवयित्रीचा काव्यसंग्रह थेट आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रकाशित होणे ही उमरखेडसाठी अभिमानाची बाब मानली जात आहे. विविध सामाजिक संस्थांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# पाटणबोरीत वारंवार वीज खंडित; नागरिक त्रस्त

प्रतिनिधी ३० मार्च

**यवतमाळ :** पांढरकवडा तालुक्यातील सर्वात मोठ्या गावांपैकी एक असलेल्या पाटणबोरी येथे वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. पाटणबोरी येथील स्वतंत्र पावरहाऊसमधून अर्ली, माथार्जून व पाटण या भागांना वीजपुरवठा केला जातो. मात्र दिवसातून अनेक वेळा लाईन जाणे-येणे ही नित्याची बाब झाली आहे.

सकाळ आणि सायंकाळच्या वेळी वीज खंडित होण्याचे प्रमाण अधिक असून, नागरिकांच्या दैनंदिन कामकाजावर त्याचा विपरीत परिणाम होत आहे. तसेच, मुख्य लाईन बंद पडल्यास संबंधित कर्मचाऱ्यांचे फोनही बंद राहत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे.

दरम्यान, सध्या मार्च एंडिंगच्या पार्श्वभूमीवर वीज बिल वसुली मोहिमेला वेग देण्यात आला आहे. मात्र, चुकीचे रिडिंग लावून जादा दराने बिल आकारले जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. एका बाजूला वारंवार वीज खंडित होत असताना दुसऱ्या बाजूला वाढीव बिलाची वसुली केली जात असल्याने संताप व्यक्त होत आहे.

येथील अभियंता पांढरकवडा येथून ये-जा करत असल्यामुळे स्थानिक पातळीवर नियंत्रणाचा अभाव जाणवत आहे. सबस्टेशनवर वरिष्ठ अधिकारी नसल्याने कर्मचाऱ्यांवर कोणताही वचक नसून, कामाच्या नावाखाली वारंवार लाईन बंद केली जात असल्याची परिस्थिती आहे.

उन्हाळा वाढत असताना एप्रिल, मे आणि जून महिन्यांत परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे वीजपुरवठ्याच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी मागणी पाटणबोरी येथील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

सोमवार दि. ३० मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com



## शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकाऱ्यांना भ्रष्टाचाराची घाई...

# शिक्षण विभागात दफ्तर दिरंगाई !


## नागरिकांची सनद नसल्याने मुजोर अधिकारी वाऱ्यावर

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशीमच्या माध्यमिक शिक्षण विभागात मागील १५ वर्षापासून दफ्तर दिरंगाईने ग्रासलेले आहे. मुजोर अधिकाऱ्यांना वठणीवर आणण्यासाठी शासनाने विस वर्षापुर्वीच नागरिकांची सनद चा कायदा करून तो कायदा अंमलात आला आहे. वाशीम येथील माध्यमिक शिक्षण विभागात जिल्ह्यातील माध्यमाक व उच्च माध्यमिक विभागातील अनेक कर्मचारी दररोज येतात. त्यांना आवश्यक असलेली माहिती माहितीच्या अधाकारात, अर्ज दूवुनही मागतात. परंतु आजपर्यंत शेकडो लोकांना कार्यालयीन व माहितीच्या अधिकारात मागितलेली माहिती मिळालीच नसल्याचा आरोपही जाणकार मंडळीकडून होत आहे. येथील माध्यमिक शिक्षण विभागाचा सर्व कारभार सुरळीत चालावा, कार्यालयात येणाऱ्या सर्वांची कामे तातडीने व्हावीत यासाठी सुद्धा वरिष्ठांनीच पुढाकार घ्यावा अशी मागणी शिक्षणप्रेमी नागरिकांकडून होत आहे.

वाशीमच्या माध्यमिक शिक्षण विभागात मागील अनेक वर्षापासून सुनावणीचे शेकडो प्रकरणे धुळखात पडलेली आहेत. सोबतच अनेक माहिती अधिकारा अंतर्गत मागितलेल्या माहिती संदर्भातील अनेक प्रकरणे कथित उपशिक्षणाधिकाऱ्याने प्रलंबित ठेवण्याचा महापराक्रम केल्याची शिक्षण विभागात चर्चा आहे. या अभिनव फंड्यातून कथित उपशिक्षणाधिकाऱ्याने मोठ्या प्रमाणात 'माया' जमा केल्याची नाराज मंडळीमध्ये चर्चा आहे. या सर्व गैरप्रकाराला वरिष्ठांची 'साथ' असून लोकप्रतिनिधींनी सुद्धा मौनव्रत धारण केल्याचे चित्र आहे. कथित उपशिक्षणाधिकाऱ्याने कार्यालयातील धुळखात ठेवण्यासाठीही आकाशभरारी घेतल्याची चर्चा आहे.

वाशीमच्या माध्यमिक विभागाला माहितीच्या अधिकारा अंतर्गत मागितलेल्या शेकडो अर्जांचे व तक्रारीचे



गठ्ठेच्या गठ्ठे कार्यालयात धुळखातं पडलेले आहेत. याची नोंद कार्यालयातील आवक नोंदवहीमध्ये नमूद केलेली आहे. वाशीम जिल्ह्यातील अनेक शैक्षणिक संस्थांमध्ये कार्यकारिणीतील गटा-गटांमध्ये वाद सुरू असल्याचा फायदा शिक्षण विभागातील झारीतील शुक्राचार्यांनी घेतला आहे. तसेच संस्थाचालकांनी, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी दिलेल्या तक्रारीबाबत कथित उपशिक्षणाधिकाऱ्यासह आजी-माजी माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांनी सुनावणी घेवून अद्यापही शेकडो प्रकरणांचा निकालच दिला नसल्याची धक्कादायक माहिती प्राप्त झाली आहे. संस्थाचालकांच्या आपसी वादाचा फायदा घेवून संबंधित अधिकारी, उपशिक्षणाधिकारी एका गटाला झुकते माप देवून त्या गटाकडून मोठ्या प्रमाणात मलिदा लाटून प्रतिस्पर्धी गटाला न्यायालयाचा रस्ता दाखवत असल्याचे वास्तव शिक्षण विभागात सुरू आहे. झुकते माप देणाऱ्यांकडून विविध कामे मार्गी लावण्यासाठी लाखो रूपये घेवून प्रतिस्पर्धी गटाचे नुकसान करून त्यांना मानसिक, शारीरिक व आर्थिक त्रास देण्याचा फंडा शिक्षण विभागात बदनाम झालेले कथित अधिकारी वापरत असल्याची माहिती सुनावणीच्या निकालाच्या प्रतीक्षेत असलेल्या आणि माहितीच्या अर्जाची माहिती मिळण्याची वाट पाहणाऱ्या मंडळीकडून प्राप्त झाली आहे.

माध्यमिक शिक्षण विभागातील सुरु असलेल्या सावळागोंधळावर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी मौनव्रत धारण करून कथित अधिकाऱ्यांना खुलेआम लूट करण्यासाठी राजाश्रय दिला असल्याची चर्चा आहे.


शिक्षण अधिकाऱ्यांनी मागितली ५० हजाराची लाच...
द्या दाम तरच काम, भ्रष्टाचारी त्यांचे नाम!
जिल्ह्यातील शिक्षकांचे होतंय मरण...
शिक्षण विभागाचे 'पावित्र्य' धोक्यात!
न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन!
भ्रष्टाचारात 'आकाशभरारी'!
स्थावर संपत्तीमध्येही 'आकाशभरारी'!
करा चेक, घोटाळे अनेक!
प्रलंबीत ठेवण्यात 'आकाशभरारी'!
पात्र व्यक्तींना केले अपात्र!
पवित्र पोर्टल झाले अपवित्र, माध्यमिक शिक्षण विभागाचे चित्र,
भरती घोटाळा विचित्र!

## थोडक्यात

### गावागावात जाऊन ज्ञानगंगेची जनजागृती



● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगरुळपीर तालुक्यातील अतिशय दुर्गम भागात फॉरेस्ट जंगल एरिया मध्ये रुई धानोरा येथे तत्त्वदर्शी संत रामपाल जी महाराज यांचे तत्त्वज्ञान 'ज्ञानगंगा' व 'जगण्याचा मार्ग 'या पवित्र ग्रंथाच्या माध्यमातून अनेक गावातील घरोघरी पोहोचले. महाराजांचे शिष्यगणांनी आज या ग्रंथांचे धर्मार्थ सेवा करण्याचे निश्चित केले होते,

**कबीर, और ज्ञान सब ज्ञानड़ी, कबीर ज्ञान सो ज्ञान ।**
**जैसे गोला तोब का, करता चले मैदान ।।**

त्यानुसार प्रत्येक तालुक्यातील एक वा दोन गावांची निवड करून त्या गावात सकाळी नऊ ते दुपारी तीन वाजेपर्यंत ग्रंथ वितरण सेवा करण्यात आले. ऋतू मानात बदल झालेला आहे, उष्णतेचा पारा वाढत चालला आहे आणि सोबतच महायुद्धाचे संकट जगावर पसरलेले आहे, अशा परिस्थितीत महाराजांच्या शिष्यगणाने उन्हामध्ये घरोघरी, रस्त्यावर व दुकानावर फिरून पुस्तक व जगण्याचा मार्ग या पुस्तकातील तत्वज्ञानाची माहिती जनतेला दिले. सोबतच संत रामपाल जी महाराज यांच्या पुस्तकाचे वितरण सेवा केली. व जगण्याचा मार्ग, आणि ज्ञानगंगा हे दोन ग्रंथ सध्या जगभर पसरत असलेल्या महायुद्धाचे संकटापासून मुक्तता मिळण्यासाठी व निष्पाप जीवांचा नाश होऊ नये यासाठी 'विश्वशांती महा अनुष्ठान' करण्याचे नियोजन केले आहे, याची माहिती देत शांती व समाधान कसे मिळते, मोक्ष कसा मिळतो, त्यासाठी कोणती भक्ती पद्धती अवलंबणे आवश्यक आहे, ब्रह्मा विष्णू महेश कोण आहेत, या सृष्टीचा रचेते कोण आहेत, ते कुठे राहतात, त्याना कोणी कोणी पाहिले आहे, त्यांचे दर्शन कसे होते आणि मानव देवी देवतांची भक्ती करून ही दुःखी का आहे, त्या दुःखातून मुक्तता कसे मिळवावे याबाबतची माहिती जनतेला संक्षिप्त मध्ये सांगितले. तेव्हा अनेक गावातील अनेक लोकांनी, मुला मुलींनी, तरुण तरुणांनी, थोर वृद्धांनी गोरगरिबांनी सर्वच स्तरातल्या लोकांनी आणि पुस्तकाच्या किमती अत्यल्प असले तरी ज्ञानाचे मूल्य अमूल्य असल्याचे लक्षात आल्यावर अनेकानी पुस्तक घेण्यासाठी उत्स्फूर्त सहभाग नोंदवाला. आत्मा व परमात्मा यांचा परस्पर संबंध व ज्ञानाची माहिती देऊन आत्म्याला दुःख होऊ नये, आत्म्याला सुख मिळावं, खोटे बोलू नये, सदाचारी असावे, काया मने वाचे कोणालाही दुःख देऊ नये, वाईट वर्तन व्यसन करू नये या सर्व वाईट वर्तनाचे दुष्परिणाम फार मोठ्या प्रकारचे असून त्यामुळे नरक यातना भोगावे लागतील, या नरक यातनातून सुटका करण्यासाठी सदाचरण व सत्य भक्तीच्या माध्यमातून शांती समाधान व मोक्ष मिळविण्यासाठी ही पुस्तके मोलाचे मार्गदर्शन करतील याची माहिती महाराजांच्या शिष्यांनी लोकांना दिली. आणि लोकांनी सुद्धा आनंदाने पुस्तके घेऊन वाचन करून सत्य भक्तीचा मार्ग अवलंबण्याचे मनोगत व्यक्त केल्याचे महाराज शिष्यांना चर्चेअंती लक्षात आले.

### ग्राम अडोळी येथे धम्मदेशना कार्यक्रम उत्साहात

**वाशीमः** तालुक्यातील ग्राम अडोळी येथे रविवार, २९ मार्च रोजी अमिताभा बुद्धीस्ट सोसायटी पुणेच्या वतीने धम्मदेशना कार्यक्रम उत्साहात घेण्यात आला. यावेळी भन्ते राहुल वटफळी यांनी उपस्थित राहून उपासक उपासिकांना धम्मदेशना दिली. कार्यक्रमात भन्ते राहुल यांनी जगात चाललेल्या युद्धावर भाष्य करतांना सांगीतले की, आज जगाला युद्धाची गरज नसुन बुद्धाची नितांत गरज आहे.


अधिकारी पैशासाठी लाचार, बांधकाम विभागात भ्रष्टाचार...
आधी दाम, नंतर काम, टक्केवारीत बदनाम!
पोहरादेवीच्या कामात ४०० कोटींचा भ्रष्टाचार!
भ्रष्टाचाराची चतुःसुत्री, देखभाल दुरुस्ती कागदोपत्री!
भ्रष्टाचाराची 'सुविधा', मॅनेज 'निविदा'!
पोहरादेवीच्या विकासासाठी आलेल्या ६५० कोटींची विल्हेवाट!
पोहरादेवीच्या विकास कामाच्या भ्रष्टाचारात...
भक्तांचीच टक्केवारी, अधिकाऱ्याची भागिदारी!

## आता काही नाही राहिले नवल...

# बांधकाम विभाग भ्रष्टाचारात अव्वल!

### गुणवत्ता नियंत्रक अधिकारी आणि वरिष्ठांसह लोकप्रतिनिधीच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशीम जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता शुभम जोशी यांच्या अफलातून कारभाराच्या अनेक सुरसकथा चर्चिल्या जात आहेत. गैरप्रकारात अव्वल असलेल्या जोशींची सखोल चौकशी करण्यासाठी मंत्र्याचा दबाव येत असल्याची बांधकाम विभागात चर्चा आहे. गुणवत्ता नियंत्रक अधिकारी यांनी जोशी यांना तब्बल २० पत्र देवूनही त्यापैकी एकाही पत्राची जोशी यांनी दखल न घेता त्यांचा 'अफलातून' कारभार सुरु ठेवल्याने वरिष्ठांसह जिल्ह्यातील सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उभे राहिले असल्याची चर्चा आहे. वाशीम जिल्ह्यातील मानोरा



तालुक्यातील बंजारा समाजाची काशी असलेल्या पोहरादेवीच्या विविध विकासकामांसाठी केंद्र व राज्य शासनाने अगोदर ५५० कोटीचा व सद्या ४०० कोटीचा निधी दिला. या कोट्यवधीच्या विकासकामात कार्यकारी अभियंता जोशी यांनी अनियमितता करून त्यांच्या गॉडफादरची मर्जी सांभाळण्यासाठी गॉडफादरच्याच चेलेचपाट्यांना कामे दिलीत. या कामामध्येसीद्धा मोठ्या प्रमाणात गैरप्रकार केल्याचा आरोप होत आहे. त्या पाठोपाठ जिल्हा नियोजन समितीमधून वाशीम येथील ३४



शासकीय निवासस्थानाच्या देखभाल, दुरूस्तीसाठी प्रत्येकी १० लाख रूपयेप्रमाणे एकूण तिन कोटी ४० लाख रुपयाचा निधी मंजुर करण्यात आला. परंतु या निधीची ३१ मार्चपुर्वी विल्हेवाट लावून कोट्यवधीची उलाढाल करून मालामाल होण्यासाठीच कार्यकारी अभियंता जोशी यांनी शासन निर्णयाला बगल देवून ती कामे त्यांच्या मर्जीतील ठेकेदारांना वाटलीत. असा आरोप बांधकाम विभागात चर्चा आहे. या सर्व गैलप्रकाराची चौकशी करण्यासाठी काँग्रेसचे नेते आमदार विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत लक्षवेधी लावून शासनाला जाब विचारला आहे. राज्याचे सार्वजनिक बांधकाम विभाग राज्यमंत्री ना .इंद्रनील नाईक यांनी पुढाकार घेतल्याचे समजते. गैरकारभारात तरबेज असलेले जोशी यांना माजी पालकमंत्र्यांचा वरदहस्त आहे. त्या मंत्रीमहोदयाचचे व पुसदच्या नाईक घराण्याचे विळया-भोपळ्याचे सख्य असल्याची चर्चा आहे.

## मानोरा येथे विविध महोत्सवाचे आयोजन

**मालेगाव :** अखिल भारतीय नाट्य परिषद मुंबई संयुक्त शाखा मानोरा मालेगाव च्या वतीने शाखा नटश्री बहू. संस्था मानोरा व स्त्रिशक्ती बहू. संस्था मानोरा चे संयुक्त विद्यमाने सोमवार दि. ३० मार्च २०२६ रोजी डॉ. सुहास देशमूख सभागृह वाशीम अर्बन बँकेच्या जवळ कलावंत, लोक कलावंतांचा मेळावा व विविध कला महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून चित्रपट अभिनेत्री सोनाली मेश्राम, चित्रपट निर्माते, लेखक, दिग्दर्शक, अभिनेते श्री राजराणा व अन्य मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास कलावंत म्हणून, लोक कलावंत म्हणून येणाऱ्या तरुण व जेष्ठ, महिला व पुरुष यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. आलेल्या सर्व कलावंताना विविध कला सादर करण्याची संधी मिळणार आहे. वरील कार्यक्रम सकाळी ११ ते ५ वाजे पर्यंत होणार आहे. तरी सर्व कलावंतानी कलावंत मेळाव्यास उपस्थित राहण्याचे आवाहन ना. प. शाखेचे प्रमुख कार्यवाह यशवंत पद्मगीरवार व शाखेचे कोषाध्यक्ष माणिक डेरे यांनी केले आहे.

## भ्रष्टाचाराची खात्री, घरकुलाचे बांधकाम कागदोपत्री !

● सिटी न्युज ब्युरो @ शेलुबाजार ●

नजीकच्या चोरद येथे घराचे कोणत्याच प्रकारचे बांधकाम न करता आपला मुलगा असल्या कारणाने घरकुल योजनेचे दोन हप्ते देण्यात आले असून या गंभीर प्रकाराची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी चोरद ग्रामस्थांनी केली आहे. यांनी गटविकास अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी वाशिम यांच्याकडे केली आहे. मंगरूळपीर तालुक्यातील चोरद ग्राम पंचायतच्या सरपंच यांचा मुलगा विनोद ऊकंडा भोंडणे यांना शबरी आवास योजनेतून घरकुल मंजुर झाले होते.






घराचे बांधकाम करण्यासाठी आवश्यक असलेला पहिला टप्पा म्हणजे पायाचे बांधकाम करणे त्याकरिता विनोद ऊकंडा भोंडणे यांना पहिला हप्ता देण्यात आला. परंतु त्यांनी कोणतेच बांधकाम केले नाही. त्यानंतर कोणत्याही प्रकारचे जिओ टॅग फोटो न करताच दुसरा हप्ता सुध्दा देण्यात आला. तरी सुद्धा आज पर्यंत घराचे कोणतेच बांधकाम सदर लाभार्थ्याने केले नाही. त्यामुळे सरपंचांनी आपला स्वतःचा मुलगा असल्याने कर्मचाऱ्यांवर दबाव टाकून त्यांना घरकुलाचे बांधकाम न करता हप्त्याचे पैसे देण्याचे काम केले आहे. त्यामुळे यासर्व गैर प्रकाराची चौकशी करून सरपंच व लाभार्थ्यावर कारवाईची मागणी चोरद ग्रामस्थांनी यांनी गटविकास अधिकारी मंगरूळपीर व मुख्य कार्यकारी अधिकारी वाशिम यांच्याकडे केली आहे. घराचे बांधकाम करण्यासाठी आवश्यक असलेला पहिला टप्पा करण्यासाठी विनोद ऊकंडा भोंडणे यांना देण्यात आला.

चोरद ग्रामस्थांनी तक्रार घरकुल लाभार्थ्याने कागदपत्राची कोनत्याच प्रकारची पूर्तता केलेली त्यांची फाईल पंचायत समितीकडे पाठवण्यात आली.

## धुरामुळे महामार्गावर अपघाताची स्थिती...

# महामार्गावरील उकिरड्याला भीषण आग

● सिटी न्युज ब्युरो @ केनवड ●

रिसोड तालुक्यातील पिंपरी सरहद्द (जि. वाशिम) येथे पुलगाव–जालना राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या उकिरड्याला रविवारी (दि. २९ मार्च) सायंकाळी सुमारे सातच्या सुमारास भीषण आग लागल्याची घटना घडली. या आगीमुळे निघालेल्या दाट धुरामुळे संपूर्ण गाव धुराच्या विळख्यात सापडले, तर महामार्गावरील वाहतूकही काही काळ विस्कळीत झाली.

मिळालेल्या माहितीनुसार, गावालगतच्या शेतात गव्हाचा काडीकचरा व शेतीतील अवशेष जाळण्यात येत होते. दरम्यान, अचानक वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यामुळे ही आग उग्र रूप धारण करून शेजारील उकिरड्यापर्यंत पोहोचली. उकिरड्यातील विविध कचऱ्यामुळे आग



अधिक भडकली आणि मोठ्या प्रमाणात काळा धूर निघू लागला. या धुरामुळे गावातील नागरिकांना श्वास घेण्यास त्रास झाला. तसेच पुलगाव–जालना राष्ट्रीय महामार्गावरील वाहनचालकांना समोरील रस्ता स्पष्ट दिसेनासा झाला. परिणामी काही ठिकाणी वाहन घसरून किरकोळ अपघात झाल्याची माहिती स्थानिकांकडून मिळाली. दरम्यान, धुरामुळे रस्ता दिसत नसल्याने वाहनचालकांमध्ये गोंधळ निर्माण झाला होता. अशा वेळी गावातील प्रसन्न



जीत देशमुख यांनी पुढाकार घेत स्वतः रस्त्यावर उभे राहून वाहनांना हळू चालवण्याचे आवाहन केले तसेच वाहनधारकांना योग्य दिशा दाखवत मोलाची मदत केली.

त्यांच्या या धाडसी कृतीमुळे संभाव्य मोठा अपघात टळल्याचे नागरिकांनी सांगितले. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी तात्काळ अग्निशामक दलाशी संपर्क साधला. मेहकर नगर परिषद तसेच मालेगाव नगरपंचायतीचे अग्निशामक बंब

### वाहनधारक त्रस्त

घटनास्थळी दाखल झाले. जवानांनी तत्परतेने प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मिळवले. मात्र, कचऱ्यामुळे धुराचे लोट बराच वेळ सुरूच होते. या घटनेची माहिती मिळताच महसूल विभागाचे तलाठी आखाडे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे आग आटोक्यात आणण्यात यश आले. या घटनेमुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, वेळेत मिळालेल्या प्रतिसादामुळे मोठा अनर्थ टळला. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी शेतातील कचरा जाळताना योग्य ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## जिल्हाधिकारी कार्यालयात...

# 'जिल्हास्तरीय जनगणना कक्ष' सुरू; प्रक्रियेच्या समन्वयाला गती !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यातील जनगणना प्रक्रियेचे प्रभावी सनियंत्रण व समन्वयन साधण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीतील तळमजल्यावर जिल्हास्तरीय जनगणना कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. या कक्षाचे उद्घाटन आज दि.(२६) मार्च रोजी प्रधान जनगणना अधिकारी तथा जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या शुभहस्ते पार पडले.

नव्याने स्थापन करण्यात आलेल्या या कक्षामार्फत जिल्ह्यातील जनगणना कामकाजाचे नियोजनबद्ध पद्धतीने निरीक्षण, समन्वय आणि अंमलबजावणी करण्यात येणार असून, संपूर्ण प्रक्रियेला अधिक गती व पारदर्शकता मिळणार आहे. या प्रसंगी भारतीय प्रशासकीय सेवेतील



परिविक्षाधीन अधिकारी तथा कारंजा उपविभागीय अधिकारी आकाश वर्मा, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, नगरपालिका सहआयुक्त डॉ. बाबुराव बिक्कड, तहसीलदार निलेश पळसकर, प्रतिक्षा तेजनकर, जनगणना संचालनालयाचे सहायक संचालक प्रवीण भगत, जिल्हा समन्वयक ऋषीकेश पाथरे, शशांक रुखने आदी उपस्थित होते.

# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

सोमवार, दि. ३० मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


# अकोटफाईल भागात दोन गटात भिडंत

प्रतिनिधी ३० मार्च





**अकोला :** शहरातील अकोट फाईल मधील मस्तान चौकात रविवारी रात्री काँग्रेस आणि एमआयएमचे नगरसेवक आणि त्यांच्या समर्थकात रविवारी रात्री भिडंत झाली. दोन्ही गट एकमेकांसमोर आले. एकावर धारदार शस्त्राने हल्ला करण्यात आला. चाकू हल्ल्यात तो गंभीर जखमी असून अन्य चौघे यात जखमी झाले आहेत. सध्या त्यांच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. राजकीय वाद विकोपाला गेल्यामुळे घटनेने गंभीर स्वरूप घेतल्याचे कळते.

प्राप्त माहितीनुसार महापालिका निवडणुकीचे निकाल जाहीर होताच काँग्रेस आणि एमआयएम या दोन्ही पक्षांचे नगरसेवक आणि समर्थक यांच्यातील तणाव सातत्याने वाढतचं आहे. रविवारी रात्री अकोट फाईल भागात एमआयएमचे नगरसेवक सय्यद रहीम सय्यद हाशम आणि काँग्रेसचे नगरसेवक अब्दुल करीम यांच्यातील शाब्दिक वादाचे रूपांतर झटापट, हाणामारी आणि दगडफेकीत झाले. गोंधळा

## ♦ ५ जण जखमी, परिसरात तणाव

दरम्यान, एका व्यक्तीवर धारदार शस्त्राने हल्ला झाला. या घटनेत शेख जुबेर शेख हबीब, अब्दुल सलामखान अब्दुल करीम, सै.अजीम. सै.कलीम, सै. अमीन सै. कलीम यांच्यासह एकूण पाच जण जखमी झाल्याची माहिती आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ पोलिस अधिकारी घटनास्थळी दाखल झाले होते. अकोटफाईल पोलिस स्टेशनचे निरीक्षक शेख आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तणाव कमी करण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी पोलिस कारवाई करीत आहेत. या घटनेत दोन्ही पक्षाचे चार चार अशा आठ जणांना ताब्यात घेतले आहे. त्यापैकी ५ जणांना अटक, २ जखमी तर १ फरार आहे. तसेच दोन्ही बाजूच्या तक्रारीवरून गुन्हे दाखल करण्यात आले आहे असे पोलिस निरीक्षक शेख यांनी सांगितले. तसेच परिस्थिती सध्या नियंत्रणात असल्याची माहिती देखील त्यांनी दिली.

# नांदुरा येथील 105 फूट हनुमान मूर्तीचा रौप्य महोत्सव

## विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन



प्रतिनिधी ३० मार्च

**खामगांव :** येथील श्री तिरुपती बालाजी संस्थानच्या वतीने जगातील प्रसिद्ध १०५ फूट उंच हनुमान मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठेला यावर्षी २५ वर्षे पूर्ण होत आहेत. देशभरातून विविध परिसरातून हजारोंच्या संख्येने अनेक हनुमान भक्त येथे दर्शनासाठी येत असतात. या निमित्ताने 'हनुमान जयंती व ब्रह्मोत्सव २०२६ - रौप्य महोत्सव' अत्यंत उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. संस्थानच्या वतीने ३० मार्च ते ४ एप्रिल २०२६ या कालावधीत अखंड होमहवनाचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्य सोहळा गुरुवार, २ एप्रिल २०२६ रोजी संपन्न होईल. सकाळी १० वाजता हनुमानजींना माल्यार्पण करण्यात येईल, तर दुपारी १२:३० वाजता भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ५ वाजता शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात येईल. या महोत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे सकाळी होणारे माल्यार्पण. हे माल्यार्पण बुलढाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या शुभहस्ते संपन्न होईल. या सोहळ्यासाठी केरळचे विशेष 'सांस्कृतिक वेशभूषा पथक आणि वाद्य' निमंत्रित करण्यात आले असून, ते उपस्थितांचे मुख्य आकर्षण ठरणार आहे. तरी परिसरातील सर्व हनुमान भक्तांनी या रौप्य महोत्सवी कार्यक्रमाचा लाभघ्यावा, असे आवाहन श्री तिरुपती बालाजी संस्थानचे अध्यक्ष फनेंद्र उरिमी, संस्थान निर्माण समिती, मोहनराव नारायण नेत्रालय आणि समस्त नांदुरा नगरीच्या वतीने करण्यात आले आहे.

# 'लोक स्वातंत्र्य विश्वशक्ती गौरव' पुरस्काराचे वितरण

## विविध क्षेत्रांत कार्यरत महिलांचा गौरव

प्रतिनिधी ३० मार्च



**अकोला :** लोक स्वातंत्र्य पत्रकार महासंघार्फे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी रजधुळ' मासिकाच्या संपादिका आणि समाजसेविका देवकाबाई देशमुख होत्या. लोक स्वातंत्र्य विश्वशक्ती पुरस्काराने विविध क्षेत्रातील महिलांना सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या स्मिताताई झावरे, राज्य अन्न आयोगाच्या सदस्य मायाताई इरतकर, ज्येष्ठ पत्रकार संजय देशमुख उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन आणि दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. गणेश वंदनेनंतर मुख्य सोहळ्याला प्रारंभ झाला. शहरासह राज्यातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तव्यदक्ष महिलांना 'लोक स्वतंत्र विश्वशक्ती गौरव' या राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात आले. यामध्ये लिनेस क्लबच्या प्रदेशाध्यक्ष कल्पनाताई देशमुख, देशमुख महिला मंडळाच्या अध्यक्ष राजश्री देशमुख, समाजसेविका पल्लवी दिवेकर यांच्यासह विविध क्षेत्रातील महिलांचा सन्मान करण्यात आला. या प्रसंगी शहीद जवान, अन्यायग्रस्त महिला, आत्महत्याग्रस्त शेतकरी, दिवंगत पत्रकार आणि विविध अपघातांत प्राण गमावलेल्या व्यक्तींना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सोहळ्याला पत्रकार संघटनेचे सदस्य, हितचिंतक आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि यशस्वी संयोजन जया भारती इंगोले व दीपाली बाहेकर यांनी केले.

# रिधोरा शिवारात कुजलेल्या अवस्थेत आढळलेल्या मृतदेहाची ओळख पटली

प्रतिनिधी ३० मार्च

**अकोला :** बाळापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रिधोरा शिवारात एका अज्ञात तरुणाचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह सापडल्याने खळबळ उडाली होती. मात्र, पोलिसांनी अत्यंत कौशल्याने मृताची ओळख पटवून या हत्याकांडाचा छडा लावला. याप्रकरणी मृत तरुणाच्या दोन आरोपी मित्रांना अटक केली आहे. पोलिसांनी तपास चक्र फिरवून मृतदेहाची ओळख पटवली. तो बाळापूर तालुक्यातील अमानतपुर तकोडा येथील रहिवासी वाल्मिक खंडारे असल्याचे निष्पन्न झाले. घटनेची माहिती मिळताच पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पाहणी केली आणि तपासाला सुरुवात केली. स्थानिक गुन्हे शाखा पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. त्यामध्ये वाल्मिक खंडारे हा त्याचे दोन मित्र आदेश सुधीर डोंगरे आणि अभिषेक प्रकाश गवळी यांच्यासोबत जाताना दिसला. हत्येनंतर दोन्ही आरोपी वेगवेगळ्या ठिकाणी पसार झाले होते. पोलिसांनी दोन पथके तयार करून त्यांचा शोध सुरू केला. अखेर गुन्हे शाखेने अभिषेक गवळीला दर्यापूर येथून तर आदेश डोंगरेला भुसावळ येथून ताब्यात घेतले. चौकशी दरम्यान आरोपींनी कबुली दिली की, दारूच्या नशेत त्यांच्यात आपसात वाद झाला आणि त्या रागातून त्यांनी वाल्मिकची हत्या केली.

# श्रवण भक्तीच श्रेष्ठ–हभप राजेंद्र महाराज वक्टे



प्रतिनिधी ३० मार्च

**अकोला :** कलियुगात नाम साधना ही भगवंत प्राप्तीच्या मार्गात ज्याप्रमाणे सर्वश्रेष्ठ आहे, त्याचप्रमाणे कलियुगात श्रवण भक्ती ही श्रेष्ठ आहे. भगवंताचे नाम श्रवण कथा कीर्तनाच्या अनुषंगाने करून शाश्वत सुखाची प्राप्ती श्रवण भक्तीच्या माध्यमातून करने या कलियुगात अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन हभप राजेंद्र महाराज वकटे यांनी केले.

दाबकी रोडच्या कर्ता हनुमान मंडळाच्या वतीने कर्ता हनुमान मंदिरात सुरू असलेल्या संगीतमय शिवपुराण कथेत पाळोदी येथील कथाकार हभप राजेंद्र महाराज वक्टे यांनी कथेचे पुष्प गुंफले. भगवंताला 'स्वामी' मानून दासासारखे विनम्र भावनेने उभा राहणे होय.हनुमान, विठ्ठलभक्त संत हे याचे उत्तम उदाहरण असल्याचे वक्टे यांनी सांगितले. ते म्हणाले, सख्यभक्ती ही या भक्ती प्रकारात येत असून यामध्ये भगवंताशी मैत्रीचा भाव, समान वातावरणातील सख्य केल्या जाते. यात सुदामा, अर्जुन आदींची उदाहरणे येतात. कार्यक्रमात बालिका शिवाई सचिन म्हैसने हिने छत्रपती शिवाजी महाराज व माता जिजाबाई यांची शौर्य गाथा सादर करून आपल्या वकृत्व कलेची चुणूक दाखविली. यावेळी टाळ्यांच्या गजरात तिचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. सर्वप्रथम मंडळाचे अध्यक्ष सुभाष म्हैसने व माजी नगरसेविका सौ मंगला म्हैसने यांनी हभप वकटे महाराज यांचे स्वागत केले. तर दैनिक अन्नदाते अजिंक्य येंडोले तथा रमेशराव बोराखडे यांचा सत्कार करण्यात आला. संचालन गजानन धरमकर यांनी केले.गुरुवार दि २ एप्रिल पर्यंत नित्य साय ७ ते रात्री १० वाजेपर्यंत आयोजित या कथेचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांनी केले.

# घरगुती गॅसबाबत तक्रार निवारणासाठी पुरवठा कार्यालय कक्ष स्थापन

प्रतिनिधी ३० मार्च

**अकोला :** जिल्ह्यातील घरगुती एलपीजी गॅसच्या सुरळीत वितरणाकरिता, तसेच घरगुती गॅसचा अवैध वापर रोखण्याकरिता जिल्हा स्तरावर दक्षता व फिरत्या पथकाद्वारे तपासण्या होत आहेत. त्याचप्रमाणे, जिल्हा स्तरावर जिल्हा पुरवठा कार्यालयात तक्रार निवारण कक्ष' स्थापन करण्यात आला आहे. त्याचा संपर्क क्र. ८०१०१५३७८० हा आहे.

सद्य:स्थितीमध्ये पेट्रोल,डिझेल, व घरगुती गॅस या इंधनासंदर्भात प्राप्त तक्रारींचे तातडीने निवारण होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने अकोला जिल्ह्यातील नागरिकांकडून दूरध्वनी संदेशाद्वारे प्राप्त होणा-या तक्रारींचे निवारण करण्यासाठी हा कक्ष स्थापण्यात आला आहे. तक्रार निवारण कक्षामध्ये अधिकारी, कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पुरवठा अधिकारी यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, गॅस एजन्सीमध्ये अनावश्यक गर्दी करू नये. गॅस सिलेंडरबाबत आपणास काही अडचण /समस्या असल्यास हेल्पलाईन क्रमांकावर आपली तक्रार नोंदवावी. आपल्या तक्रारीचे निराकरण करण्यात येईल. हेल्पलाईन क्र. ८०१०१५३७८० हा आहे.

# जैन मंदिरात जन्म कल्याणक महोत्सव



प्रतिनिधी ३० मार्च

**अकोला :**जैन धर्माचे २४ वे तिर्थकर भगवान महावीर यांचा जयंती महोत्सव सोमवार, ३० मार्च रोजी उत्साहाने साजरा करण्यात येणार आहे. महोत्सवाचे आयोजन स्थानिक सैतवाल दि. जैन मंदिर किल्ल्याजवळ करण्यात आले. महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

त्यानिमित्त कार्यक्रमांचे आयोजन कार्यकारिणीद्वारा करण्यात आले आहे. सोमवारी सकाळी ७.३० वाजता गांधी जवाहर बागेत असलेल्या महावीर स्तंभाचे पूजन करण्यात आले. तेथे सैतवाल सेवासंघ द्वारा प्रभावना वितरीत होईल. त्यानंतर सैतवाल दि. जैन मंदिरात सकाळी ९ वाजता भगवान महावीर जन्मोत्सव साजरा करण्यात आले आहे. यात भगवान महावीरांचा पाळणा, अंगाई गीत तथा भ. महावीरांचे चरित्र कथा व महिला मंडळाद्वारे होईल. १० वाजता भ. महावीरांचा १०८ कळसाद्वारे अभिषेक, अष्टकपुजा, जयमाला, आरती होऊन प्रभावना वितरीत करण्यात आली. समाजबांधव महोत्सवाला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मालमत्ता, पाणीपट्टी कर भरण्यासाठी नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी ३० मार्च



**अकोला :** ३१ मार्च पर्यंत सास्ती योजनेचा लाभ मिळणार असल्याने अधिकाधिक करदात्यांनी कराचा भरणा करावा असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले होते. त्यानुसार दोन तीन दिवसात झोन कार्यालयात गर्दी दिसते.

पाणीपट्टी कर आणि मालमत्ता कर भरण्याकरिता शनिवार व रविवार सुट्टीच्या दिवशीही कारसुरूये सुरू होती. शहरातील नागरिकांना त्यांचे पाणीपट्टी कर आणि मालमत्ता कराचा भरणा करणे अधिक सोयीचे व्हावे यासाठी प्रशासनाद्वारा शनिवार आणि रविवार सुट्टीच्या दिवशीही कार्यालय सुरू ठेवण्यात येणार आहे कृपया नागरिकांनी याची नोंद घेऊन या संधीचा लाभ घेऊन आपला पाणीपट्टी कर आणि मालमत्ता कराचा भरणा करून सहकार्य करण्याचे आवाहन मनपा प्रशासना द्वारा करण्यात आले आहे. डाबकी रोड पोलीस स्टेशनच्या बाजूला शाळेमध्ये सोमवारी सकाळ पासून मालमत्ता व पाणी कर भरण्यासाठी गर्दी होती असे उपायुक्त गजानन घोंगे यांनी सांगितले.

# जलकुंभीस घेऊन नगरसेवक आक्रमक

प्रतिनिधी ३० मार्च


## ♦ जलकुंभी काढण्यासाठी पोकलेन मशीन घंट्याने की रोजाने ?



**अकोला :** शहराला विभाजित करणाऱ्या मोरणा नदीतील जलकुंभीमुळे शहरात वाढलेले डासाचे प्रमाण पाहता शहरातील नागरिकांचे विशेषता नदी काठावरील लोकांचे जगणे असह्य झाले आहे. महापालिका केवळ फोटोसेशन साठी नदीतील जलकुंभी काढण्याचे काम करीत आहे या आशयाची बातमी कालच सिटी न्यूज सुपरफास्टने प्रसारित केली होती. आज सोमवारी या बातमीचे पडसाद महापालिकेच्या आमसभेत उमटले. जलकुंभीच्या समस्येस घेऊन भाजपाच्या मंजुषा शेळके आणि अनिल गरड चांगलेच आक्रमक झाले होते मंजुषा शेळके यांनी मच्छराच्या समस्येने नागरिकांचे जगणे नकोसे झाले आहे. नागरिकांना मलेरिया डेंग्यू आणि त्वचा संबंधी समस्या निर्माण होत आहेत. तुम्ही मागील वर्षी जलकुंभी काढण्यासाठी किती खर्च केला तेवढे सांगा ? हा प्रश्न केल्यावर आरोग्य विभागाचे अधिकारी राजूरकर आणि क्षेत्रीय अधिकारी अनिल बिडवे यांनी सादर केलेल्या आकड्यात चांगलीच विसंगती दिसून आली राजूरकर साहेबांनी सांगितले २५ लाख तर बिडवे साहेबांनी सांगितले १४ लाख त्यामुळे कोण खरे आणि कोण खोटे हा प्रश्न निर्माण झाला होता. तर भाजपाचे नगरसेवक अनिल गरड यांनी जलकुंभी काढण्यासाठी जी पोकलेन मशीन लावली आहे ती घंट्याने आहे की रोजाने? हा प्रश्न उपस्थित करत प्रशासनाला चांगलेच कैचीत पकडले होते. ते म्हणाले की केवळ एकच पोकलेन मशीन चालू आहे ती सुद्धा कधी चालू तर कधी बंद असते. त्यामुळे जलकुंभी काढण्यासाठी वाटल्यास अजून निधी वाढवून द्यावा परंतु नागरिकांना भेडसावणारी ही समस्या एकदाची निकाली काढावी अशी विनंती त्यांनी सभागृहाला केली. आतापर्यंत जलकुंभी काढण्यासाठी महापालिकेने लाखो रुपये खर्च केले आहेत परंतु त्यावरही ही समस्या कायमच आहे. संबंधित ठेकेदार पावसाळ्यापर्यंत कसेतरी रखडत रखडत हे का सुरू ठेवतो कारण एकदा का जर नदीला पूर आला तर ही जलकुंभी पूर्णपणे वाहून जाते. त्यामुळे ठेकेदाराचे काम सोपे होऊन जाते. मागील साडेतीन-चार वर्षापासून महापालिकेत प्रशासक राज सुरू असल्याने मनमानी कारभार सुरू होता परंतु आता जनप्रतिनिधी आल्याने प्रशासनाची चांगलीच गोची होत असल्याचे आजच्या सभेत दिसून आले

# अकोल्यातील हनुमान मंदिरांवर विद्युत रोषणाई, सुशोभीकरण

प्रतिनिधी ३० मार्च



**अकोला :** प्रभू श्रीरामचंद्रांचा जन्मोत्सव अर्थात 'रामनवमी' उत्साहात साजरी झाल्यानंतर, आता सर्व भाविकांना प्रतीक्षा लागली आहे ती त्यांचे परमभक्त महाबली हनुमान यांच्या जयंतीची. येत्या गुरुवार, २ एप्रिल रोजी देशभरात हनुमान जयंती साजरी केली जाणार आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील सर्व हनुमान मंदिरांमध्ये सध्या विशेष तयारी सुरू असून उत्सवाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

हनुमान जयंतीनिमित्त शहरातील जवळपास सर्वच हनुमान मंदिरांची स्वच्छता आणि रंगरंगोटी करण्यात आली आहे. मंदिरांवर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली असून, रात्रीच्या वेळी ही मंदिरे प्रकाशाने उजळून निघत आहेत. विशेषतः सालासर हनुमान मंदिर, काळा मारुती मंदिर, बालाजी मॉल जवळील हनुमान मंदिर, तपे हनुमान मंदिर आणि श्री राजराजेश्वर मंदिर परिसरातील हनुमान मंदिर यांसह अनेक ठिकाणी जय्यत तयारी सुरू आहे.

हनुमान जयंतीच्या निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये प्रामुख्याने सुंदरकांड पठण, हनुमान चालीसा पठण आणि भजनांच्या कार्यक्रमांचा समावेश आहे.

गुरुवार, २ एप्रिल रोजी पहाटे ५:४५ वाजता सर्व मंदिरांमध्ये हनुमान जन्मोत्सवाचा मुख्य सोहळा पार पडणार आहे. जन्मोत्सवानंतर दुपारी सर्व मंदिरांमध्ये भव्य 'महाप्रसादाचे' आयोजन करण्यात आले आहे. या मंगल प्रसंगी सर्व हनुमान भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन विविध मंदिर व्यवस्थापन समित्यांच्या वतीने करण्यात आले आहे.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135



CMYK CMYK